


# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ११४ * नांदेड * गुरूवार, दि. ३० एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# प. बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यात विक्रमी ९० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान

## प. बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार, एक्झिट पोलचा अंदाज

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालमधील दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचे मतदान संपले आहे. पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांपेक्षा जास्त आणि दुसऱ्या टप्प्यात ९० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले आहे. यामुळे ममता बॅनर्जी सत्ता राखणार की भाजपची सत्ता येणार यावरून चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर एक्झिट पोलचे अंदाज येण्यास सुरुवात झाली आहे. प्रमुख संस्थांच्या एक्झिट पोलच्या अंदाजांनुसार पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे.

प्रजा पोलच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १७८ ते २०८ जागा जिंकेल तर पोल डायरीच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १४२ ते १७१ जागांवर बाजी मारेल. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार भारतीय जनता पार्टी १४६ ते १६१ जागांवर विजयी होईल. चाणक्य स्टॅटेजीझच्या एक्झिट पोलने भाजप १५० ते १६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त केला आहे. पश्चिम बंगालबाबतच्या जेव्हीसीच्या एक्झिट पोलनुसार भाजपला १५० ते १८० जागा जिंकता येतील. तसेच पीएमएआरक्यूच्या पश्चिम बंगालबाबतच्या एक्झिट पोलनुसार भाजप १५० ते १७५ जागा जिंकेल.

पश्चिम बंगालच्या विधानसभेत एकूण २९४ जागा आहेत. यामुळे १४७ किंवा त्यापेक्षा जास्त जागा जिंकल्यास स्पष्ट बहुमताच्या जोरावर भाजप सत्ता स्थापन करू शकेल. एक्झिट पोलचे अंदाज पश्चिम बंगालमध्ये भाजप बहुमत मिळवेल असाच अंदाज व्यक्त करत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये सध्या तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. २९४ पैकी २२१ जागांवर विजय मिळवत तृणमूल काँग्रेसने २०२१ मध्ये राज्यात सत्ता स्थापन केली. भाजपने २०२१ च्या निवडणुकीत ६५ जागांवर विजय मिळवला होता. ही पश्चिम बंगालमधील भाजपची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

पश्चिम बंगालमधील दुसऱ्या टप्प्याचे मतदान संपले आहे. नियमानुसार संध्याकाळी पाच वाजता मतदानाची वेळ संपली. आता जे मतदार रांगेत असतील फक्त त्यांनाच मतदान करता येईल. नव्याने कोणालाही मतदानासाठी रांगेत उभे राहण्याची परवानगी नसेल. यासाठी संबंधित मतदान केंद्रातले निवडणूक अधिकारी शेवटच्या मतदाराची नोंद करून ठेवतील, त्यानंतर सुरक्षा रक्षकांच्या बंदोबस्तात शेवटच्या मतदाराने हक्क बजावेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू राहणार आहे.

### तामिळनाडू सत्तेचे समीकरण

तामिळनाडूमध्ये द्रमुक आघाडी आपले वर्चस्व कायम राखणार असल्याचे चित्र आहे. चॅट जीपीटीने डीएमके आघाडीला ११० ते १३५ जागांचा अंदाज दिला असला, तरी जेमिनी आणि परप्लेक्सिटी यांनी अनुक्रमे १४८ आणि १८५ पर्यंत जागा मिळतील, असे भाकीत वर्तवले आहे. अण्णा द्रमुक आघाडीला येथे तगड्या विरोधाचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

### केरळमध्ये 'लाल किल्ला' ढासळणार

केरळमध्ये मात्र राजकीय परंपरेला साजेसा बदल पाहायला मिळू शकतो. चॅट जीपीटी आणि जेमिनी या दोघांनीही काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'यूडीएफ' आघाडीला सत्तेच्या जवळ नेले आहे. मात्र, 'ग्रोक' ने डाव्यांच्या 'एलडीएफ' आघाडीला झुकते माप दिले असल्याने केरळचा निकाल चुरशीचा ठरणार हे स्पष्ट आहे.

### आसाममध्ये पुन्हा एकदा फुलणार कमळ!

ईशान्येकडील महत्त्वाचे राज्य असलेल्या आसाममध्ये भारतीय जनता पक्षाचा विजयरथ रोखणे काँग्रेसला कठीण जाणार असल्याचे एआयचे सर्वच पोल्स सांगत आहेत. चॅट जीपीटीने ७५ ते ९५, तर जेमिनीने ८५ ते ९५ जागा भाजप आघाडीला मिळतील असा अंदाज वर्तवला आहे. विकासकामे आणि हिंदुत्वाचा अजेंडा आसाममध्ये भाजपसाठी सत्तेचे हॅट्रिक मिळवून देताना दिसत आहे.

# 'त्या' चार मुलांच्या मृत्यूप्रकरणी निलंबित दोन अभियंत्यावर गुन्हा दाखल

## अजूनही मुख्य कंत्राटदार फरार

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील देगलूर नाका परिसरातील एमजीआर गार्डन भागात इस्लामपूरा येथे महानगरपालिकेचा कंत्राटदार आणि शेजारील प्लॉट धारकांनी बेजबाबदारपणे खड्डा खोदून त्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. दुर्दैवानं त्याच खड्ड्यात १६ एप्रिल रोजी याच भागातील चार शाळकरी मुलांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात संबंधित कंत्राटदाराने मयतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी १५ लाख रुपये दिले. त्यानंतर इतवारा पोलीस ठाण्यात कंत्राटदाराच्या काही व्यक्तीवर आणि शेजारी प्लॉट धारकावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणांमध्ये महापालिकेच्या दोन निलंबित उपअभियंत्यानाही गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले आहे. मात्र या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याने संताप व्यक्त होत आहे.

देगलूर नाका भागातील इस्लामपूरा येथे महानगरपालिकेचे काम सुरू आहे. हे काम महानगरपालिकेने मे. गुरु रामदास कन्स्ट्रक्शन नांदेड यांना दिले होते. सदरचे काम हे पाणीपुरवठा पाईपलाईन खोदकामाचे होते. कंत्राटदार आणि महानगरपालिकेच्या या विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्याने खड्ड्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने याच भागात राहणारे मोहम्मद अली मोहम्मद इद्रीस, सय्यद फरखान सय्यद फिरोज, मोहम्मद अदनान मोहम्मद फिरोज, आणि मोहम्मद रेहान हे चार शाळकरी मुले पोहण्यासाठी पाण्यात उतरले. पाण्याचा त्यांना अंदाज न आल्याने त्यांचा त्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी द्विसदस्य समिती नेमली. ज्यात अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम आणि मिर्झा बेग यांनी २४ तासांत अहवाल सादर केल्यानंतर आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी उपाभियंता शिवकल्याणी जायभाये आणि कनिष्ठ अभियंता किरण सूर्यवंशी यांना तात्काळ निलंबित केले होते. त्याच प्रकरणात प्रभारी कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, उपअभियंता प्रकाश कांबळे आणि कनिष्ठ अभियंता जक्की अहमद यांना आपणास निलंबित का करण्यात येऊ नये असे कारणे दाखवा नोटीस पाठवली होती. या प्रकरणात सय्यद फिरोज यांच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात प्लॉटधारक युसुफ मकरांनी, कंत्राटदाराचे प्रकल्प पर्यवेक्षक सुरेश कांबळे, प्रकल्प अभियंता आणि देखरेख करणारा व्यक्ती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात वाढ करून उपअभियंता शिवकल्याणी जायभाये आणि किरण सूर्यवंशी यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या प्रकरणातील मे. गुरु रामदास कन्स्ट्रक्शनचा मुख्य मालक मात्र फरार असल्याचे सांगण्यात आले.

**राष्ट्रीय मानव विकास आयोगानेही घेतली दखल**

नांदेड येथे झालेल्या या दुर्दैवी घटनेची दखल राष्ट्रीय मानव विकास आयोगाने घेतली आणि जिल्हाधिकारी आयुक्त यांना या प्रकरणात १५ दिवसांत अहवाल पाठविण्याचे आदेशित केले आहे. त्यामुळे या प्रकरणाची गंभीरता अजून वाढली आहे.

# नांदेड जिल्ह्यात तीव्र चलन टंचाई

## खा. अशोकराव चव्हाण यांचे रिझर्व्ह बँकेला तातडीचे पत्र

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील तीव्र चलन टंचाईबाबत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रादेशिक संचालकांना पत्र लिहून पुरेसे चलन तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.



जिल्ह्यात सध्या लग्नसराईचा हंगाम आणि शेतकऱ्यांची पेरणीपूर्व लगबग सुरू असतानाच चलनाची मोठी टंचाई निर्माण झाली असून, खा. अशोकराव चव्हाण यांनी या गंभीर परिस्थितीबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

आपल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, नांदेड जिल्ह्यासाठी मुख्य 'करन्सी चेस्ट' म्हणून काम करणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शिवाजीनगर शाखेतील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. या चेस्टची मर्यादा ४५० कोटी रुपये असताना सध्या तिथे केवळ मर्यादित रक्कम उपलब्ध आहे. जिल्ह्याची दैनंदिन गरज पाहता उपलब्ध निधी जेमतेम दोन दिवस पुरू शकेल अशी स्थिती आहे. चलनाचा पुरवठा कमी असल्याने याचा मोठा फटका लग्नकार्य असलेल्या कुटुंबांना आणि बियाणे-खते खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना बसला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत रोख रकमेचे महत्त्व मोठे असून सद्यस्थितीत डिजिटल व्यवहारांतही अनेक अडचणी आहेत. नांदेड करन्सी चेस्टकडून सातत्याने मागणी करूनही नागपूर विभागाकडून पुरेशी रोख रक्कम पुरवण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेने या समस्येची तातडीने दखल घेऊन जिल्ह्याची पुढील सात दिवसांची गरज पूर्ण करण्यासाठी किमान २०० कोटी रुपये उपलब्ध करून द्यावेत, असेही खा. अशोकराव चव्हाण यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

**दोन दिवस पुरेल इतकाच जिल्ह्यात चलन साठा**

जिल्ह्यात सध्या लग्नसराईचा हंगाम आणि शेतकऱ्यांची पेरणीपूर्व लगबग सुरू आहे. यातच जिल्ह्यात दोन दिवस पुरेल इतकाच चलन साठा असल्याने याचा परिणाम ग्रामीण भागात होताना दिसण्याची शक्यता आहे.

# धर्माबाद : पोहण्यासाठी विहिरीत उतरलेल्या दोन युवकांचा विजेचा धक्का लागून मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** धर्माबाद शहरानजीक येताळा रोडवरील विहिरीमध्ये पोहायला उतरलेल्या दोन युवकांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी दुपारी १.४५ ते २.१५ च्या दरम्यान घडली आहे. अविनाश भोजन्ना तोंडाकुरवाड (वय २२, रा. रत्नाळी) व कृष्णा नागनाथ माडगिनवार (वय २५, रा. रसिकनगर) अशी या दोघांची नावे आहेत.



हे दोघेजण विहिरीमध्ये पोहण्यासाठी गेले असता विहिरीच्या पाण्यात विज उतरल्याने सदरची घटना घडली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केल्या गेला आहे. सदर घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. पोलिसांनी देखील धावत घटनास्थळी पोहोचत मदत कार्य सुरू केले होते.

ज्या विहिरीमध्ये ही घटना घडली, ती विहीर अतिशय मोठी व रुंद तसेच यात तब्बल ३० फूट पाणी असल्याचे समजत आहे. मदत कार्य करताना दोघांनी पाण्यात वीज उतरली असल्याचे सांगितले होते, त्यानंतर वीज बंद करून त्या भागात शोधाशोध सुरू झाली होती. बराच वेळ शोधाशोध केल्यानंतर या दोन्ही युवकांचे मृतदेह हाती लागले. पोलिसांनी रितसर पंचनामा करत दोन्ही मृतदेह ग्रामीण रुग्णालय धर्माबाद येथे उत्तरीय तपासणीकरिता पाठवले आहेत.

# सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीत संतोष देशमुख यांच्या पत्नीचा पराभव

**बीड (प्रतिनिधी)–** बीडच्या केज तालुक्यातील मसाजोग येथील ग्रामपंचायतच्या सरपंच पदासाठी मतदान प्रक्रिया २८ एप्रिलला पार पडली. या निवडणुकीमध्ये ८४ टक्के मतदान झाले होते. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर सरपंच पद रिक्त झाले होते. त्यानंतर ही निवडणूक झाली असून यामध्ये आश्विनी देशमुख यांच्यासमोर स्वरूपानंद देशमुख यांनी आव्हान निर्माण केले होते. काल झालेल्या मतदानात गावातील २ हजार ८४ मतदारांपैकी १ हजार ७४४ मतदारांनी आपला हक्क बजावला होता. मस्साजोग ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीचा निकाल बुधवारी जाहीर झाला. या अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या निवडणुकीत स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांनी विजय मिळवला आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक पथकाकडून ८७ लाख रुपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त

## नांदेडमध्ये अवैध वाळूविरूद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध वाळूविरूद्ध पोलीस उपमहानिरीक्षक पथकाकडून कारवाई करत ८७ लाख रूपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत होत्या. सदर अवैध रेती विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकास नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील कल्हाळ शिवारात पाठविले होते. सदर पथकाने, दि. २८ एप्रिल रोजी रात्री अकरा वाजता कल्हाळ शिवारातील वाळू धक्कयावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या माध्यमातून नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, तीन इंजिन बोट, एक फायबर बोट, वाळूने भरलेले ३४ तराफे यांच्यासहित, भारत बेंज कंपनीचा एक हायवा, एक जेसीबी मशीन व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (६०) ब्रास वाळू, असा एकूण ८७ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



नमूद प्रकरणात चार आरोपीस ताब्यात घेवून त्यांच्याविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरनं ४६७/२०२६ कलम ३०३ (२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर प्रकरणाचा तपास नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यातील हवालदार भोकरे करत आहेत.

सदर कारवाईमुळे, मिळालेल्या माहितीवरून कल्हाळ येथील गोदावरी नदी पात्रातून मोठया प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, हवालदार संजीव जिंकलवाड, अंमलदार गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. मागील काही दिवसांपासून सदर पथकाने अवैध व्यवसायांच्या विरुद्ध उल्लेखनीय व धाडसी कामगिरी केली असून, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र दिनापासून अवैध व्यवसायांविरुद्ध विशेष मोहीम दिनांक १ मेपासून, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायांचे विरोधात पुन्हा विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. सदर मोहीम ही दि. १ ते ३१ मे दरम्यान सुरू राहील. या मोहिमेत, परिक्षेत्रातील सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे.

# पालकमंत्री अतुल सावे नांदेड दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे ३० एप्रिल व १ मे २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.




गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ वा. छत्रपती संभाजीनगर येथून शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व राखीव. सकाळी ९.३० वा. शासकीय विश्राामगृह नांदेड येथून श्री. शंकरराव चव्हाण सभागृह, विष्णुनगर नांदेडकडे प्रयाण. सकाळी १०.३० वा. शंकरराव चव्हाण सभागृह विष्णुनगर नांदेड येथे कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यास उपस्थिती. सायं. ६.१५ वा. श्री. शंकरराव चव्हाण सभागृह विष्णुनगर नांदेड येथून श्रीलक्ष्मी गार्डन मंगल कार्यालय, तरोडा बु. नांदेडकडे प्रयाण. सायं. ६.३० वा. ॲड. मयुर व ॲड. ऐश्वर्या यांच्या मंगल परिणय निमित्त स्वागत समारोहास उपस्थिती. स्थळ– श्रीलक्ष्मी गार्डन मंगल कार्यालय, तरोडा बु नांदेड. सोईनुसार शासकीय विश्रामगृह नांदेड जि. नांदेड येथे आगमन व राखीव.

शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी सकाळी ८ वा. शासकीय विश्राामगृह नांदेड येथून वजीराबाद पोलीस मुख्यालय, कवायत मैदान नांदेड येथे आगमन व महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०.३० वा. खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीस उपस्थिती. स्थळ– जिल्हा नियोजन भवन सभागृह, नांदेड . सोयीनुसार जिल्हा नियोजन भवन नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

# शिवसेना ठाकरे गटाकडून अंबादास दानवेंना विधानपरिषदेची उमेदवारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचं लक्ष लागलेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकांसाठी उमेदवारांची अधिकृतपणे घोषणा होण्यास सुरुवात झाली असून भाजपनंतर आता शिवसेना ठाकरे गटाकडून महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. माजी विरोधी पक्षनेते आणि शिवसेना नेते अंबादास दानवे यांचं नाव विधानपरिषदेचे उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून विधानपरिषदेसाठी उद्धव ठाकरेंचं नाव चर्चेत होतं. तसेच, काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून त्यांनाच आग्रह केला जात होता. मात्र, अंबादास दानवे ठाकरेंच्या शिवसेनेकडून विधान परिषदेवर जाणार असल्याची माहिती आदित्य ठाकरेंनी पत्रकार परिषदेत दिल्याने आता सस्पेन्स संपला आहे.



# क्रिकेटर रियानवर कारवाई होणार?

**मुंबई (प्रतिनिधी)–** आयपीएल २०२६ मध्ये वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या राजस्थान रॉयल्सचा कॅप्टन रियान पराग चांगलाच अडकला आहे. पंजाब किंग्सविरुद्धच्या मंगळवारच्या सामन्यात तो ड्रेसिंग रूममध्ये 'ई-सिगारेट' पिताना कॅमेरात कैद झाला. रियान पराग मोठा शॉट मारण्याच्या नादात आऊट झाला. त्यानंतर तो ड्रेसिंग रुममध्ये जाऊन बसला. ड्रेसिंग रुममध्ये गेल्यानंतर तो १६व्या ओव्हरमध्ये कॅमेऱ्यात दिसला. तिथं तो ध्रुव जुरैलसोबत टीमची बॅटिंग पाहत होता. यावेळी त्याने ई सिगारेट ओढल्याचं कॅमेऱ्यात स्पष्टपणे दिसतंय. त्यानंतर आता त्याच्यावर फौजदारी कारवाई होणार का? असा सवाल विचारला जात आहे.

# नांदेड शहरात सतत वीज गुल! महापौरांकडून गंभीर दखल

## महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत घेतली तातडीची आढावा बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून नांदेड शहराच्या विविध भागांत वीज पुरवठा खंडित होण्याच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे यांनी बुधवारी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वाची आढावा बैठक महापालिकेत पार पडली.

या बैठकीला महापौरांसह उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, माजी उपमहापौर सतीश देशमुख, नगरसेवक संजय मोरे, अभिषेक सौदे, राजु काळे, तुलजेश यादव, राजेश यन्नम, महावितरणचे अधिक्षक अभियंता विनय घनबाहादुर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुरेंद्र कांबळे, बळवंत बोननकर, सहायक अभियंता सचिन कल्याणकर, बळीराम तोटेवाड, प्रियंका तम्मेडवार, तसेच महानगरपालिकेचे शहर अभियंता सुमंत पाटील, कनिष्ठ अभियंता राजकुमार बोडके आदी उपस्थित होते.

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना वीज वारंवार खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे नागरिक त्रस्त असून महावितरणने तांत्रिक बिघाड त्वरित दुरुस्त करून अखंडित वीज पुरवठा करावा, अशा सूचना महापौरांनी दिल्या. शहरातील वीज तक्रारींसाठी असलेले टोल-फ्री क्रमांक आणि स्थानिक तक्रार निवारण केंद्रे तत्परतेने काम करत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. ही केंद्रे २४ तास कार्यान्वित ठेवून नागरिकांना तात्काळ प्रतिसाद देण्यात यावा. त्याचप्रमाणे आगामी पावसाळा लक्षात घेता, धोकादायक विद्युत तारा, वाकलेले खांब आणि झाडांच्या फांद्या छाटणीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील पथदिव्यांच्या वीज पुरवठ्याबाबत मनपा आणि महावितरणमध्ये समन्वय असावा, जेणेकरून मुख्य रस्ते अंधारात राहणार नाहीत. पायाभूत सुविधे संदर्भात नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे आणि जुन्या वाहिन्या बदलण्याचे काम प्राधान्यक्रमाने हाती घेण्याचे महापौरांनी सूचित केले.



बैठकी दरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी उत्तर नांदेड भागातील विजेच्या तक्रारी पाहता नव्याने ५० डी.पी.बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे सांगितले. या नव्याने प्रस्तावित असलेल्या डी.पी.साठी महापालिकेमार्फत ओपन स्पेसच्या जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. त्याचप्रमाणे पिरबुऱ्हान नगर भागातील महापालिकेची १ एकर जागा उपकेंद्रासाठी देण्यात येत असल्याबाबत यावेळी महावितरण अधिकाऱ्यांनी महापौरांचे आभार व्यक्त केले. एकंदरीत महावितरणला महापालिका प्रशासन सर्वोतपरी सहकार्य करेल असे आश्वासन यावेळी महापौरांनी दिले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# उघड्यावरचे अन्न : जिभेचे चोचले की, जीवघेणा धोका?

झारखंडमधील गिरिडीह जिल्ह्यातील बाजो गावात पाणीपुरीमुळे झालेल्या विषबाधेची घटना ही केवळ एक अपघात नसून, आपल्या अन्नसुरक्षेच्या व्यवस्थेतील गंभीर त्रुटीचे ज्वलंत उदाहरण आहे. एका सात वर्षीय निष्पाप मुलाचा मृत्यू आणि सुमारे ६० जणांची प्रकृती बिघडणे ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. काही क्षणांची चटकदार चव किती मोठी किंमत मोजायला लावू शकते, याची ही भीषण जाणीव करून देणारी घटना आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अन्न लवकर खराब होते, ही सर्वज्ञात बाब आहे. तरीदेखील, शहरांपासून गावांपर्यंत उघड्यावर विकले जाणारे खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणावर ग्राहकांना आकर्षित करतात. पाणीपुरी, भेळ, चाट, कापलेली फळे, ज्यूस किंवा बर्फाचे गोळे, हे सर्व पदार्थ चवीला जरी आकर्षक वाटले, तरी त्यांच्या स्वच्छतेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. बहुतांश वेळा हे पदार्थ उघड्यावर, धूळ, माशा आणि प्रदूषणाच्या संपर्कात ठेवले जातात. शिवाय, वापरले जाणारे पाणी स्वच्छ आहे की नाही, याची कोणतीही खात्री नसते. झारखंडमधील घटनेतही प्राथमिक तपासातून शिळे अन्न आणि दूषित पाणी हे कारण असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अनेक दिवस फ्रिजशिवाय ठेवलेले साहित्य, त्यात वाढलेले जीवाणू आणि त्याचा थेट परिणाम ग्राहकांच्या आरोग्यावर, ही साखळी अत्यंत धोकादायक आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध यांच्यासाठी अशा अन्नपदार्थांचा धोका अधिक गंभीर ठरतो. हा प्रकार केवळ एका राज्यातील नाही तर संपूर्ण देशामध्ये असाच होतो आहे. अगदी नांदेडसारख्या शहरामध्ये देखील खालून गटार वाहत आहे आणि वर मात्र पाणीपुरी विकली जात आहे, असे दृश्य सगळीकडे पाहायला मिळते. एवढे असून देखील सुज्ञ समजले जाणारे लोक त्या ठिकाणी मिटक्या मारीत विष पोटात घालीत असतात. यानंतर झालेल्या विषबाधेची माहिती कोणी कोणाला सांगत नाही. अगदी मोठ्या समजल्या जाणाऱ्या हॉटेलमधून देखील दिले जाणारे अन्न हे झोपडपट्टीमध्ये अस्वच्छ अवस्थेमध्ये तयार केलेले असते, हे बहुतेकांना माहीत नाही. केवळ हातमोजे घालून आणि डोक्यावर टोपी लावून ते पदार्थ विकले म्हणजे स्वच्छता आहे असे म्हणणे चुकीचे ठरते. या पार्श्वभूमीवर एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल की, रस्त्यावर व उघड्यावर मिळणारे खाद्यपदार्थ खाणे पूर्णपणे टाळले पाहिजे. ही केवळ सूचना नाही, तर काळाची गरज आहे. चटकदार चव आणि कमी किंमत याच्या मोहात पडून आपण स्वतःच्या आरोग्याशी खेळ करत आहोत. अन्न ही केवळ भूक भागवण्याची गोष्ट नसून, ती आपल्या आरोग्याचा पाया आहे. त्यामुळे अन्नाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड अजिबात परवडणारी नाही. याचबरोबर, या प्रश्नाकडे केवळ वैयक्तिक जबाबदारी म्हणून पाहून चालणार नाही. अन्न आणि औषध प्रशासन मंडळाची जबाबदारी अधिक मोठी आहे. अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. परंतु विक्रेत्यांसोबत अर्थपूर्ण संबंध असल्यामुळे ही मंडळी काही करीत नाही. उघड्यावर अन्न विकणाऱ्या विक्रेत्यांची नियमित तपासणी, स्वच्छतेचे निकष, पाण्याची गुणवत्ता आणि अन्न साठवणुकीची पद्धत, या सर्व बाबींचे काटेकोर पालन झाले पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासोबतच, त्यांचा परवाना रद्द करण्यासारखी कठोर पावले उचलली गेली पाहिजेत आणि अशी कारवाई न करणाऱ्या अन्न आणि औषध प्रशासन मंडळाच्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई झाली पाहिजे. आज अनेक ठिकाणी अन्नसुरक्षेचे नियम केवळ कागदावरच मर्यादित राहिले आहेत. प्रत्यक्षात मात्र, कोणतीही तपासणी न होता विक्री सुरू असते. ही स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. प्रशासनाने केवळ घटनांनंतर जागे होण्याऐवजी, पूर्वतयारी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात, जेव्हा अन्न लवकर खराब होते, तेव्हा अधिक दक्षता घेणे गरजेचे आहे. नागरिकांनीही आपल्या आरोग्याबाबत सजग राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. बाहेरचे अन्न खाताना स्वच्छता, ताजेपणा आणि पाण्याची गुणवत्ता यांची खात्री करणे आवश्यक आहे. शक्यतो घरचेच ताजे आणि स्वच्छ अन्न खाण्यावर भर दिला पाहिजे. बाहेरचे अन्न खाल्ल्यानंतर उलट्या, जुलाब, पोटदुखी यांसारखी लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे. झारखंडमधील ही घटना एक इशारा आहे की, आपण अजूनही दुर्लक्ष केले, तर अशा घटना पुन्हा घडतील. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन या दोघांनीही आपली जबाबदारी ओळखून तातडीने पावले उचलली पाहिजेत. जिभीचे चोचले पुरविण्यापेक्षा आरोग्य अधिक महत्त्वाचे आहे, हे लक्षात ठेवणे आज अत्यावश्यक आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य



दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्राम विकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.

तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.

तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
हिंगोली

# उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या!

सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक उकाडा सहन करावा लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानेही वर्तवला आहे. मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात.

बऱ्याचदा पालकही त्यांना पैसे देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे



कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात. आहारतज्ज्ञांच्या मते कोल्ड-ड्रिंक्समध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साखर जास्त प्रमाणात पोटात गेल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो.

मुले जास्त प्रमाणात कोल्ड्रिंक्स पित असतील तर त्यांच्या शरीरातील कॅलरीज वाढल्याने त्यांचे अनावश्यक वजन वाढू शकते. कोल्ड्रिंक्समध्ये असणाऱ्या साखर आणि अन्य रासायनिक घटकाकांमुळे मुलांचे दात किडण्याचा धोका संभवतो. थंड आणि रसायनयुक्त असलेले हे कोल्ड्रिंक्स दातांच्या मुळांना कमकुवत करतात. मुलांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याने मुलांमध्ये टाइप २ डायबिटीसचा धोका वाढू शकतो. काही थंड पेयांमधील रसायनांच्या अतिवापरामुळे मुलांच्या हाडांतील खनिजांचे प्रमाण कमी होऊन हाडे कमकुवत होतात ज्यामुळे मुलांमध्ये हाडांच्या दुखापतीचा आणि फ्रॅक्चरचा धोका वाढतो.


१०० टक्के फळांचा रस असण्याचा दावा करणारे काही कंपन्यांचे फ्रुट ज्यूसचे टेट्रा पॅक बाजारांत उपलब्ध आहेत; मात्र त्यामध्ये प्रत्यक्षात फळांचा रस किती आणि इतर रसायने किती आहेत हे पॅकेटवरील घटकांचे प्रमाण वाचल्यावरच लक्षात येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत असे तयार कोल्ड्रिंक्स मुलांना देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत, लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. घरगुती पेय प्यायल्याने उन्हामुळे मुलांच्या शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता तर भरून निघेलच शिवाय मुलांना व्हिटॅमीन्स आणि मिनरल्ससुद्धा या पेयांतून मिळेल. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे !

**-सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

# विद्यार्थीप्रिय शिक्षक-हणमंत मठ्ठमवार-लच्छनकर

**विद्येनेच मनुष्या आलें, श्रेष्ठत्व ह्या जगामाजी,**
**न दिसे एकहि वस्तू, विद्येनेंही असाध्य आहे जी**

हणमंत विठ्ठलराव मठ्ठमवार यांचा जन्म दि. १५ एप्रिल १९६८ रोजी लच्छन ता. मदनूर जि. कामारेड्डी या छोट्याशा गावी झाला. स्व. सरस्वतीबाई व कै. विठ्ठलराव हे गुणी दाम्पत्य गुरुजीचे आई-वडील होत. हणमंत मठ्ठमवार यांचे घराणे निखळ वारकरी संप्रदायी आहे. मठ्ठमवार या परंपरेत लहानाचे मोठे झाले, वाढले, घडले म्हणून त्यांच्या अंगी संस्कार, शिस्त, नम्रता, परोपकारी वृत्ती दिसून येते. त्यांचे



वडील वारकरी संप्रदायाचे असल्यामुळे ते दरवर्षी पायी दिंडीत सामील होऊन पांडुरंगाच्या दर्शनासाठी जायचे. प्रतीवर्षी नेमाने कार्तिकी एकादशीला दर्शनासाठी जात असत. ती परंपरा हणमंत मठ्ठमवार यांनी कायम ठेवले आहे. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय म्हणजे शेती व मेंढपाळ होते, परंतु ते शिक्षणाचे महत्व जाणून होते, म्हणून हणमंत गुरुजींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

गुरुजींचे प्राथमिक शिक्षण जि. प. प्रा. शाळा कुंटूर येथे झाले. देगलूर महाविद्यालय, देगलूर येथून बी.ए.ची पदवी प्राप्त केली. १९८८ मध्ये डी.एड. पूर्ण केले. त्यांची प्रथम नेमणूक दि. २८ डिसेंबर १९८९ रोजी जि.प. प्रा. शाळा धाराशिव येथे झाली. त्या संधीचे सोने करीत शाळेतील प्रत्येक काम निष्ठेने व तत्परतेने केले. विद्यार्थ्यांविषयी तळमळ, प्रेम, निष्ठा आणि अध्यापनाचे उत्कृष्ट कार्य केले. अनेक विद्यार्थ्यांना घडवले. मठ्ठमवार यांनी सर्वप्रथम धाराशिव जिल्ह्यात व नांदेड जिल्ह्यातील तमलूर, उमरी आणि कापशी येथे सेवा केली. लोहा तालुक्यातील कांजाळा येथे उत्कृष्ट सेवा करून आज ते सेवानिवृत्त होत आहेत.

ग्रंथ हेच गुरू असे समजून हणमंत मठ्ठमवार यांनी लहानपणापासून वाचनाची आवड कायम ठेवली आहे. त्यांचा छंद म्हणजे सांस्कृतिक व धार्मिक कार्यात सक्रिय राहून निरपेक्ष भावनेने कार्य करीत राहणे. शिस्त हा जीवनाचा पाया आहे. या उक्तीप्रमाणे हणमंत मठ्ठमवार हे आपल्या जीवनात शिस्तीला प्राधान्य देऊन बालकांवर सुसंस्कार करुन शिक्षणाबरोबर शिस्तीचे धडे दिले आहेत. शाळेत अध्यापन व प्रशासन उत्तमरित्या सांभाळत विविध शालेय उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण केली आहे. तसेच वंचित घटकाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. म्हणूनच हणमंत मठ्ठमवार लच्छनकर यांचा गावकरीमंडळीतर्फे सन्मान करण्यात आला.

विद्यार्थी व शिक्षकांनी अलीकडील शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याकरता पालक व शिक्षक यांच्यात समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे आणि ही काळाची गरज असल्याचे ते प्रामाणिकपणे सांगतात. अशा या उपक्रमशील व हाडाच्या शिक्षकाला दीर्घ आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो हीच ईश्वरचणी प्रार्थना!

**-राजेश मठमवार**
मुख्याध्यापक
नराशाम प्रा. शाळा, सिध्दतीर्थधाम हाळदा
मो. ९५०३३२८१६४

# अधर्माचा नाश करून धर्माची स्थापना करणारा नृसिंह अवतार



नृसिंह = नृ +सिंह = मनुष्य + सिंह. अर्धा मनुष्य, अर्धा सिंह असे रूप. हा भगवान विष्णूंचा ४ था अवतार आहे.दशावतारात वराह अवतारानंतरचा अवतार.

**का घेतला अवतार?**

हिरण्यकश्यपू नावाच्या राक्षस राजाने ब्रह्मदेवाकडून वर मागितला होता. ना दिवसा ना रात्री, ना घरात ना बाहेर, ना जमिनीवर ना आकाशात, ना शस्त्राने ना अस्त्राने, ना मनुष्याकडून ना प्राण्यांकडून माझा मृत्यू होऊ नये. हा वर मिळाल्यावर हिरण्यकश्यपू उन्मत्त झाला. त्याचा मुलगा 'प्रल्हाद' मात्र विष्णूभक्त होता. बापाने खूप छळ केला तरी प्रल्हाद नामस्मरण सोडत नव्हता. शेवटी हिरण्यकश्यपूने खांबाकडे बोट दाखवून विचारले, 'तुझा देव या खांबात आहे का?' प्रल्हाद हो म्हणाला. हिरण्यकश्यपूने खांबावर गदा मारली तेव्हा त्या खांबातून नृसिंह भगवान प्रकट झाले.

**वध कसा केला?**

संध्याकाळी...ना दिवस ना रात्र.
उंबरठ्यावर..ना घरात ना बाहेर.
मांडीवर घेऊन...ना जमिनीवर ना आकाशात.
नखांनी...ना शस्त्र ना अस्त्र.

नृसिंह रूपाने...ना पूर्ण मनुष्य ना पूर्ण प्राणी अशा प्रकारे हिरण्यकश्यपूचा वध करून प्रल्हादाचे रक्षण केले. म्हणून नृसिंहाला भक्तवत्सल म्हणतात. नृसिंह जयंती चतुर्दसंध्याकाळी, सूर्यास्ताच्या वेळी पूजा करतात, कारण अवतार संध्याकाळीच झाला होता.

**नृसिंह जयंती कशी साजरी करतात?**

१. **उपवास :** अनेक भक्त दिवसभर उपवास करतात, संध्याकाळी पूजा झाल्यावर सोडतात. २. **पूजा :** संध्याकाळी नृसिंहाची मूर्ती/फोटो ठेवून हळद-कुंकू, फुले, तुळस वाहतात. पन्हं, चिंच-कैरीचा प्रसाद करतात. ३. **प्रल्हाद कथा वाचन :** नृसिंह अवताराची कथा वाचतात/ऐकतात. ४. **मंत्र जप :** ॐ उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम्। नृसिंहं भीषणं भद्रं मृत्युमृत्युं नमाम्यहम्।। हा नृसिंह मंत्र म्हणतात. ५. **कीर्तन-भजन :** मंदिरांमध्ये विशेष कीर्तन होते.

**विशेष :** महाराष्ट्रात, आंध्र-कर्नाटकात नृसिंहाची खूप मंदिरे आहेत. सिंहाचलम, अहोबिलम, याडगिरिगुट्टा ही प्रसिद्ध क्षेत्रे आहेत.

**नृसिंह पूजेचे महत्त्व**

१. **शत्रुनाश:** शत्रू, वाईट शक्तींपासून रक्षण होते. २. **भयमुक्ती :** भीती, संकटे दूर होतात. ३. **भक्ती :** देव कुठेही प्रकट होऊ शकतो, ही श्रद्धा दृढ होते. ४. **न्याय :** अधर्माचा नाश करून धर्माची स्थापना करणारा अवतार. नृसिंह म्हणजे देव भक्तांसाठी काहीही करतो याचे प्रतीक होय.

**-नेताजी भोसले**
नांदेड.
मो. ८६६८६४१९८९

# खा. डॉ. अजित गोपछडे व हडको यांच्या पुढाकारातून नांदेड मनपा शाळांमध्ये शालेय फर्निचरचे लोकार्पण

**नांदेड (प्रतिनिधी)**– खा. डॉ. अजित गोपछडे आणि हडको यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून नांदेड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शालेय फर्निचर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या फर्निचरचा लोकार्पण सोहळा दि. २९ एप्रिल रोजी पालिकेच्या शाळा क्र.०१, गांधी पुतळा, वजिराबाद येथे मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.




विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलताना नांदेड महानगरपालिकेच्या शाळांमधील भौतिक सुविधा बळकट करण्याच्या उद्देशाने खा. डॉ. अजित गोपछडे यांनी हडकोकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, हडकोच्या वतीने पालिकेच्या ११ शाळांना एकूण ५५० आधुनिक बाक आणि इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा बसण्याचा प्रश्न सुटणार असून, त्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळणार आहे.

या सोहळ्याला खा. डॉ. अजित गोपछडे यांच्यासह महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य बापू देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, शिक्षण व महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी, उपसभापती निरंजना राजू लांडगे, सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजित वायकोस, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, महानगरपालिकेचे स्थानिक नगरसेवक, शिक्षण विभागाचे अधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खा. डॉ. अजित गोपछडे आपल्या मनोगतात म्हणाले की, महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनाही खासगी शाळांप्रमाणेच आधुनिक सोयीसुविधा मिळाव्यात, हे आमचे ध्येय आहे. हडकोने दिलेल्या या योगदानामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नक्कीच बळ मिळेल. भविष्यातही नांदेडमधील शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्याचप्रमाणे शहरातील होतकरु गरजू विद्यार्थ्यांचे आरोग्य सुस्थितीत राहण्यासाठी व त्यांना व्यायामाची चांगली सवय जडण्यासाठी पालिकेतील प्रत्येक शाळेत ओपन जीम तसेच पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ. मशिन्स उपलब्ध करुन देणार असल्याची घोषणा करताना प्रत्येक शाळेत दोन संगणक संच उपलब्ध करुन देणार असल्याचे आश्वासन यावेळी खासदारांनी दिले आहे.

**नांदेडकरांकडून स्वागत**

नांदेड मनपाच्या शाळांमध्ये प्रथमच अशा प्रकारचे दर्जेदार आणि सुसज्ज फर्निचर उपलब्ध झाल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे. खासदारांच्या या विशेष प्रयत्नांमुळे शाळांची पटसंख्या वाढण्यासही मदत होईल, असा विश्वास शिक्षणप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# उमरी तालुका खरेदी-विक्री संघाच्या सभापतीपदी नारायणराव जिरोणेकर तर उपसभापती व्यंकटराव कदम यांची निवड



**उमरी (प्रतिनिधी)**– उमरी तालुका खरेदी-विक्री संघाच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी संघाच्या कार्यालयात पार पडली. या निवडणुकीत सभापतीपदी नारायणराव संभाजीराव जिरोणेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर उपसभापतीपदी व्यंकटराव देवराव पाटील कदम यांचीही बिनविरोध निवड झाली.

सभापतीपदी निवड झालेले नारायणराव जिरोणेकर हे शेतकरी विकास पॅनल, गोरठेकर गटाचे प्रतिनिधित्व करतात.

या निवडप्रक्रियेस उमरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष तथा युवा नेते कैलास देशमुख गोरठेकर, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजीव पाटील बोळसेकर, दासराव देशमुख गोरठेकर, पांडुरंग देशमुख गोरठेकर, संचालक बालासाहेब पाटील हातनीकर, रावसाहेब पाटील बोरजुनीकर, गणेश आनेमवाड, मारुती पाटील आनेराये, लक्ष्मण सिरमोड, राघोजी पाटील जाधव, संचालिका श्रीमती कलावतीबाई मारोतराव ढगे, सौ. ललिता आनंदराव यल्लमगोंडे, गणेश गाडे आदी उपस्थित होते.

# विविध स्पर्धा परीक्षेत सरतापे बंधु-भगिनींचे यश



**किनवट (प्रतिनिधी)** –गोकुंदा येथील सुमेध आनंद सरतापे व त्यांच्या दोन बहिणींनी विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले आहे.

सुमेध सरतापे यांनी स्पर्धा परीक्षेत दुहेरी यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनुसूचित जाती प्रवर्गात महाराष्ट्रातून सर्वप्रथम क्रमांक मिळवून सहायक कर अधिकारी या पदावर त्यांनी यश संपादन केले आहे. यापूर्वी स्पर्धा परीक्षेत यश मिळवून पोलीस महासंचालक कार्यालय परिक्षेत्र नांदेड येथे महसुली लिपीक म्हणून सुमेध यांची नियुक्ती झाली होती.

त्याचबरोबर श्वेता आनंद सरतापे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशस्वी होऊन कृषी सहायक अधिकारी म्हणून तिची नागपूर विभाग येथे नियुक्ती झाली आहे. सरतापे परिवारातील मुलांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत सरकारी नोकरीत प्रवेश मिळविला आहे. यामुळे विविध स्तरातून या परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गोकुंदा येथील निवासी प्राचार्य आनंद सरतापे हे सरस्वती अध्यापक विद्यालय किनवट येथे कार्यरत असून, आपल्या मुलांनी उच्चशिक्षित व्हावे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले.

याच परिवारातील त्यांची लहान मुलगी कु. अंकिता सरतापे हिने नीट परीक्षेत यश मिळवत नंदुरबार येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे एमबीबीएससाठी प्रवेश मिळविला आहे. अशा या गुणवंत मुलांचे प्राचार्य आनंद सरतापे व सौ. मनीषा आनंद सरतापे यांचे आ. भीमराव केराम, सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेमानिवार, सचिव मुख्याध्यापक कृष्णकुमार नेमानीवार, सौ. अनुजा पाटील, संस्थेचे सर्व सदस्य, इंजी. प्रशांत ठमके, मुख्याध्यापिका शुभांगी ठमके, के. के. साबळे, प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, प्राचार्य किरण पाईकराव, प्राचार्य डॉ. आनंद भालेराव, प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, डॉ सुनील व्यवहारे,डॉ. द्वारकाप्रसाद वायाळ, उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे, मुख्याध्यापक अनिल कांबळे हिंगोली, कृषी अधिकारी विनोद कदम यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# सह दुय्यम उपनिबंधक कार्यालय परिसरातून दुचाकी चोरीस

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील शिवाजीनगर परिसरातील उपनिबंधक कार्यालयासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वाघी तांडा ता. नांदेड येथील रहिवासी साहेबराव धेनु चव्हाण हे मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी नांदेड येथील सह दुय्यम उपनिबंधक कार्यालयात कामानिमित्त आले होते. त्यांनी आपली एमएच २६ बी एफ २२७१ क्रमांकाची पॅशन प्रो दुचाकी कार्यालयासमोर उभी केली होती. दुपारी १ ते २ वाजेदरम्यान अज्ञात व्यक्तींनी लंपास केल्याची घटना घडली आहे.

सह दुय्यम उपनिबंधक कार्यालयातील कामकाज आटोपून बाहेर आल्यानंतर दुचाकी वाहन जागेवर दिसून आले नाही. त्यामुळे साहेबराव चव्हाण यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. सदर दुचाकी कोणास आढळून आल्यास शिवाजीनगर पोलीस ठाणे किंवा साहेबराव चव्हाण यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ७५५८६३२७२७ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राहेरमध्ये नृसिंह जयंती उत्सव; डॉ. प्रणिता देशपांडे यांच्या कीर्तनाची रंगत

**नायगावबाजार (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील राहेर येथे नृसिंह जयंतीनिमित्त परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळत असून, विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे. उत्सवाच्या प्रारंभापासूनच मंदिरात घटस्थापना करण्यात येऊन दररोज अभिषेक, पूजापाठ, आरती व इतर धार्मिक विधी नियमितपणे पार पडत आहेत. यामुळे दिवसभर भाविकांची मोठी गर्दी होत असून, दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचा उत्साह लक्षणीय आहे.



या पार्श्वभूमीवर ह.भ.प. प्रा. डॉ. प्रणिता रवींद्र देशपांडे यांचे 'नृसिंह जन्म' या विषयावर कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वशैली, अभ्यासपूर्ण मांडणी आणि रसाळ कीर्तन परंपरेमुळे या कार्यक्रमाकडें भाविकांचे विशेष लक्ष लागले आहे. धार्मिक आशयासोबतच समाजप्रबोधनाचा संदेश देणारी त्यांची शैली श्रोत्यांना विचारप्रवृत्त करणारी ठरते.

डॉ. देशपांडे ह्या उच्चशिक्षित कीर्तनकार असून त्यांनी एम.ए. (अर्थशास्त्र) तसेच एम.ए. (कीर्तनशास्त्र) पदव्या संपादन केल्या आहेत. त्यानंतर कीर्तनशास्त्र विषयात त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. कीर्तनाच्या अनुषंगाने महाभारतातील प्रमुख स्त्री व्यक्तीरेखांचा चिकित्सक अभ्यास हा त्यांचा संशोधन विषय असून शकुंतला, अंबा, गांधारी, कुंती आणि द्रौपदी या स्त्री पात्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला आहे. त्यांचे शिक्षण कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ येथे झाले आहे.

सन १९९४ पासून त्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी खाजगी शिकवणी वर्ग चालवत असून कीर्तन, प्रवचन आणि व्याख्यानांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्यही सातत्याने करत आहेत. आकाशवाणीवरूनही त्यांनी महाभारतातील स्त्री व्यक्तीरेखांवर आधारित कार्यक्रम सादर केले आहेत. वैदर्भीय हरिकीर्तन परंपरेत पीएच.डी. संपादन करणाऱ्या त्या पहिल्या कीर्तनकार म्हणून त्यांचा विशेष गौरव झाला आहे. 'आदर्श व्यक्तीरेखा पुरस्कार' तसेच २०२२ मध्ये भावबंधन संस्थेकडून संस्कृती क्षेत्रातील पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

या कीर्तनासाठी तबल्यावर जगन्नाथ पुरी तर हार्मोनियमवर सुभाष कुलकर्णी साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन मंदिराचे पुजारी संतोष महाराज जोशी तसेच सहआयोजक धनंजय जोशी यांनी केले आहे.

नृसिंह जयंती उत्सवानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांमुळे राहेर परिसरात सध्या भक्तिभाव, अध्यात्म आणि सांस्कृतिक परंपरेचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे.

# टपाल कर्मचारी संघटनेच्या छत्रपती संभाजीनगर सर्कल सचिवपदी भिलवंडे

**नरसीफाटा (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय टपाल कर्मचारी संघटना महाराष्ट्र, गोवा राज्याचे १४ वे द्विवार्षिक अधिवेशन नांदगाव, मुरुड, जंजीरा, अलिबाग व रायगड येथे २५ व २६ एप्रिल रोजी पार पडले. यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाच्या सर्कल सचिवपदी जी. बी. भिलवंडे यांची निवड करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिनेश शहापूर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पी ३ संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. सुरेंद्र पालव, पोस्टमन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. बालकृष्णन चाळके, कॉ.एस. एस. महादेवया, सहायक जनरल सेक्रेटरी कॉ. आर. जे. चव्हाण, कॉ. पी. एच. जयवाल, कॉ. जी. व्ही. स्वामी, कॉ एम. डी. अहिरे, कॉ. बर्गे अण्णा आदी उपस्थित होते.

# ई.पी.एस.-९५ पेन्शनधारकांचा मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– ई.पी. एस.-९५ पेन्शनधारकांचा प्रादेशिक मेळावा शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विजयनगर हनुमान मंदिर मंगल कार्यालय, गणेशनगर जवळ, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक राऊत (कमांडर) हे राहणार आहेत. तसेच मेळाव्याला राष्ट्रीय पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. दिल्ली येथील दि. ९, १० व ११ मार्च २०२६ चे जंतरमंतरवरील यशस्वी आंदोलन व त्याची फलश्रुती व त्यानंतरच्या काळात पेन्शनवाढीसंदर्भातील ताज्या घडामोडी या बाबतची संपूर्ण माहिती स्वतः राऊत देणार आहेत. तसेच एस.टी. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नावर प्रांताध्यक्ष स. ना. अंबेकर हे मार्गदर्शन करणार आहेत.

तेंव्हा नांदेड जिल्ह्यातील पेन्शनर्सनी उपस्थित रारावे, असे आवाहन प्रांताध्यक्ष स. ना. अंबेकर, बी. आर. बनसोडे, दिगांबर पावडे, गणेशराव मस्के, जी. यल्लय्या, आर. व्ही. गोधरे, विठ्ठल बेद्रे, के. व्ही. गंजेवार, विश्वनाथ शिंदे, खंडेराव नाईक, स. बचिन्दरसिंग, स. राजेंद्रसिंग सिध्दु, शांतीकुमार शर्मा, आर.के. गिते, गणेश कांबळे, डी. टी. लधवे, सय्यद अहमद, डी. एम. गंगातीरे, दीपक मुदिराज, व्यवहारे पाटील, प्रभू कांबळे, घोरबांड, कोटलवार, वाय. बी. चव्हाण, हरण पाटील, व्ही.ई. जक्कलवार, अवुलवार, बोरगावे मुखेड, फुलपगार, गंगाधर आरळीकर, बारसे यांच्यासह अनेकांनी केले आहे.

# इंदापूर (पुणे) येथे वेठबिगारीत अडकलेल्या दाम्पत्याची सुटका

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यातील भेंडेगाव (ता. मुखेड) येथील दत्ता गणपत दिंडे व त्यांची पत्नी मीनाक्षी दत्ता दिंडे या मजूर दाम्पत्याची पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे वेठबिगारीतून यशस्वी सुटका करण्यात आली. ही कारवाई दि. २३ एप्रिल २०२६ रोजी प्रशासन व स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून पार पडली.

मिळालेल्या माहितीनुसार ऊसतोडणीच्या कामासाठी गेलेल्या या दाम्पत्याला मागील दोन महिन्यांपासून मुकदम व वाहनमालक यांनी इंदापूर परिसरात बेकायदेशीरपणे नजरकैदेत ठेवले होते. काम करूनही मजुरी न देणे तसेच बाहेर जाण्यास मज्जाव करणे अशा प्रकारे त्यांच्यावर अन्याय केला जात होता.

या प्रकरणाची तक्रार 'जन साहस' संस्थेच्या मजदूर हेल्पलाईन क्रमांक १८००१२०११२११ वर प्राप्त झाली होती. तक्रार मिळताच संस्थेने तत्काळ हालचाली सुरु केल्या. पीडित मजुरांचे वडील गणपत दिंडे यांनी जन साहसच्या मदतीने नांदेड जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आरडीसी नांदेड यांनी पुणे जिल्हाधिकारी तसेच कामगार विभागाशी संपर्क साधून मदतीची विनंती केली. त्यानंतर पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी इंदापूरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व कामगार विभागाला तत्काळ कारवाईचे आदेश दिले.

तहसीलदारांनी तातडीने विशेष पथक गठित करून इंदापूर येथे रेस्क्यू ऑपरेशन राबवले आणि संबंधित मजूर दात्पत्याची सुटका केली. सुटकेनंतर त्यांना अधिकृत रिलीज सर्टिफिकेट देण्यात आले.

या संपूर्ण कारवाईत जन साहस संस्थेच्या रुबीना सय्यद व बाळासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्हा समन्वयक स्नेहल निकम, ॲड, विरसेन काजळे, औरंगाबाद येथील फिल्ड ऑफिसर विक्रम ढेरे तसेच पुणे येथील फिल्ड ऑफिसर दीप्ती जाधव व सागर कलशेट्टी यांनी मोलाचे सहकार्य केले.

सुटकेनंतर संबंधित मजुरांना त्यांच्या मूळ गावी सुरक्षित पोहोचविण्यात आले असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रशासन व जन साहस यांच्या माध्यमातून पुढील प्रयत्न सुरू करण्यात येणार आहेत.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्या ध्वजवंदन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस समारंभ शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी वजिराबाद पोलीस मुख्यालय कवायत मैदान, नांदेड येथे सकाळी ८ वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभ होणार आहे. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. या समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ७.१५ पूर्वी किंवा ९ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बॅग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनानिमित्त विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पैशाच्या तगाद्याला कंटाळून एकाने केली आत्महत्या; गुन्हा दाखल




**नांदेड (प्रतिनिधी)** –बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथे दस्तगीर गल्लीमध्ये अडचणीच्या वेळी हातउसने दिलेले पैसे परत का मागत आहे व मला का त्रास देत आहे, असे म्हणून एकाने विष प्राशन करून आत्महत्या केली. या प्रकरणी एका महिलेविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुंडलवाडी शहरातील दस्तगीर गल्ली भागात २५ एप्रिल रोजी सकाळी नऊ ते साडेदहाच्या सुमारास याच भागात राहणारी महिला इंद्राबाई सयाराम गोणेलवार यांनी शेख युसूफसाब मेहबूबसाब (वय ५७) यांना कुठल्यातरी महत्त्वाच्या कामासाठी हातउसने पैसे दिले होते. ते पैसे परत मागत असताना, मला तुम्ही पैसे मागू नका व मानसिक त्रास देऊ नका असे म्हणून सदर महिलेच्या त्रासाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या इंद्राबाई गोणेलवारविरुद्ध वसीमा शेख युसूफ शेख यांच्या फिर्यादीवरून कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक गिरी करत आहेत.

**नांदेडच्या कृष्णा चौकात खुनाचा प्रयत्न**

शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत २६ एप्रिल रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास दीपक पवार, रोहित खिल्लारे, राजेश पवार आणि अविनाश पवार सर्व रा. सखोजीनगर, नांदेड यांनी संगनमत करून जुन्या भांडणाच्या कारणावरून जिवे मारण्याच्या उद्देशाने रोशन सुरेश हळदे (वय २२ वर्षे राहणार गोविंदनगर, नांदेड) याच्या गळ्यावर खंजरने वार केले व त्याला गंभीर दुखापत केली. एवढेच नाही तर जिवे मारण्याची धमकी दिली. जखमी रोशन हळदे याच्या फिर्यादीवरून चार जणांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न व भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे करीत आहेत.

# आयटीआय लोहा येथील कोट्यवधींच्या कामांमध्ये बोगसपणाचा आरोप; सखोल चौकशीची मागणी

## निकृष्ट बांधकाम, क्युरींगचा अभाव, सज्जा कोसळून कामगाराला अपंगत्व; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

**लोहा (प्रतिनिधी)**– औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोहा येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा बोगसपणा व निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य तुळशीराम लुंगारे यांच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.





या संदर्भात सादर करण्यात आलेल्या निवेदनानुसार परिसरात सिमेंट रस्ता, संरक्षण भिंत, सुरक्षा रक्षक कक्ष, नाली बांधकाम तसेच वर्कशॉप बिल्डिंगची कामे सुरू आहेत. मात्र ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर ठिकाणी मागील सहा महिन्यांपासून बोअर (कुपनलिका) बंद असल्याने पाण्याअभावी क्युरींग न करता काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नव्याने तयार केलेल्या सिमेंट रस्त्याला ठिकठिकाणी तडे गेले असून मजबुतीकरण न करता थेट काँक्रीट टाकल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

तसेच वर्कशॉप बिल्डिंगच्या बांधकामादरम्यान सज्जा कोसळून एका मिस्त्रीला गंभीर दुखापत होऊन तो पूर्णतः अपंग झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे बांधकामाच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नाली बांधकामात वापरण्यात आलेल्या लहान पाईप्समुळे पाणी योग्य प्रकारे न वाहता अडथळा निर्माण होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या सर्व प्रकाराची जबाबदारी निश्चित करून शाखा अभियंता व संबंधित कंत्राटदारांची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा १ मे २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांना माहितीस्तव पाठविण्यात आली आहे.

फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

# सतत चेहऱ्यावर वेट वाईप्स घासताय?

## व्हा सावधान! नकळतपणे होतेय त्वचेचे नुकसान

**मेकअप काढण्यासाठी आणि चेहरा स्वच्छ करण्यासाठी वेट वाईप्स हा एक अतिशय सोपा पर्याय मानला जातो. उन्हाळ्यात आपण धूळ आणि घाम साफ करण्यासाठी त्यांचा वापर करतो, पण आपल्याला हे कळत नाही की ते आपला चेहरा आणखी कोरडा आणि निर्जीव बनवू शकतात. होय, वेट वाईप्समध्ये असलेली रसायने, सुगंध आणि अल्कोहोल तुमच्या चेहऱ्यासाठी हानिकारक असू शकतात. ज्यांची त्वचा संवेदनशील आहे, त्यांना हे कमी प्रमाणात वापरण्याचा विशेष सल्ला दिला जातो.**



### चेहऱ्यातील ओलावा काढून टाकते...

बहुतेक वेट वाईप्समध्ये विविध सुगंध आणि प्रिझर्व्हेटिव्हज असतात. आजकाल, गुलाब, लॅव्हेंडर, पुदिना आणि लिंबूच्या सुगंधाचे वाईप्स उपलब्ध आहेत. ते ताजेपणा देत असले तरी, त्यांच्या सुगंधामुळे ॲलर्जीची प्रतिक्रिया होऊ शकते. या वाईप्समधील घटक त्वचेतील नैसर्गिक ओलावा काढून टाकतात, ज्यामुळे कोरडेपणा, जळजळ आणि लालसरपणा वाढतो. शिवाय, वाईप्स त्वचा पूर्णपणे स्वच्छ करत नाहीत; ते त्वचेची छिद्रे बंद करू शकतात, ज्यामुळे मुरुमे आणि ब्लॅकहेड्स होऊ शकतात.

### ॲलर्जी आणि खाज येऊ शकते...

संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांनी याचा वापर मर्यादित ठेवावा. वारंवार वापर केल्यास लालसरपणा आणि जळजळ होऊ शकते. सुगंधामुळे ॲलर्जी आणि खाज येऊ शकते. त्वचारोगतज्ज्ञ सांगतात की, उन्हाळा सुरू झाल्यावर लोकांना त्वचेवर पुरळ, खाज आणि ॲलर्जीची तक्रार असते. याचा अर्थ असा नाही की हे इतर ऋतूंमध्ये होत नाही, परंतु विचारल्यावर असे दिसून येते की उन्हाळ्यात हे अधिक सामान्य आहे, कारण ते दिवसातून अनेक वेळा वेट वाइप्स वापरतात, ज्यामुळे चेहऱ्यावर घट्टपणाची भावना येऊ शकते. या समस्या एका रात्रीत उद्भवत नाहीत; रोजच्या वापरामुळे त्यांची स्थिती आणखी बिघडते. हे वाइप्स त्वरित थंडावा देतात, परंतु त्यामध्ये असलेले मिथाइलिसोथियाझोलिनोन हे रसायन त्वचेसाठी हानिकारक आहे. हे सौंदर्य प्रसाधनांमध्ये वापरले जाणारे एक कृत्रिम संरक्षक आणि जंतुनाशक आहे. या वाइप्सच्या रोजच्या वापरामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक तेल कमी होते आणि त्वचेचा संरक्षक थर कमकुवत होतो.


### पर्याय काय आहेत?

- स्वच्छ पाण्याने चेहरा धुवा किंवा त्यावर पाणी शिंपडा.
- वाईप्स वापरण्याऐवजी, कापसाने चेहऱ्यावर कोरफडीचा गर लावा.
- गुलाबजल किंवा पुदिन्याच्या पाण्याने चेहरा स्वच्छ करा. दोन्ही दाहशामक आहेत आणि त्वचेचा pH संतुलित ठेवतात.
- तुम्ही ओलसर सुती कापडाने चेहरा स्वच्छ करू शकता.
- ही खबरदारी घ्या...
- हलका सुगंध असलेले वाईप्स वापरण्याचा प्रयत्न करा.
- ओले वाईप्स उघडे ठेवू नका.

# तुम्हीसुद्धा चेहऱ्यावर लावत असता बर्फ?

## फायदे अनुभवण्यापूर्वी तज्ज्ञांकडून जाणून घ्या 4 महत्त्वाच्या खबरदारीच्या गोष्टी...

अभिनेत्री आलिया भट्ट बर्फाच्या पाण्याने चेहरा धुवत असल्याचा एक व्हिडिओ काही काळापूर्वी



व्हायरल झाला होता, ज्याची चर्चा सुरू झाली. यापूर्वी अनन्या पांडे आणि कतरिना कैफ यांनी थंड पाण्यात चेहरा बुडविण्याचा सल्ला देणारे व्हिडिओ शेअर केले आहेत. त्यांच्या मते, थंड पाणी चेहऱ्यासाठी खूप फायदेशीर आहे. थंड पाण्यामुळे सूज कमी होण्यास, त्वचा घट्ट होण्यास आणि तिची नैसर्गिक चमक टिकून राहण्यास मदत होते. चेहऱ्यातील रक्तवाहिन्या आकुंचित झाल्यामुळे रक्ताभिसरण सुधारते. शिवाय, थंड पाण्याने चेहरा धुतल्याने मनःशांती देखील मिळते.

1 बर्फ थेट त्वचेवर लावल्याने फ्रॉस्टबाइट होऊ शकतो, म्हणून लावण्यापूर्वी तो नेहमी मऊ कापडात किंवा आईस रोलरमध्ये गुंडाळा.

2 दिवसातून दोन ते तीन वेळा थंड पाण्याने चेहरा धुणे पुरेसे आहे. जास्त धुण्यामुळे त्वचेतील नैसर्गिक ओलाव्याचे संतुलन बिघडू शकते.

3 थंड पाणी फक्त एक ते दोन मिनिटांसाठीच वापरावे.

4 ज्या लोकांची त्वचा खूप संवेदनशील आहे किंवा ज्यांना रोझेशियाचा त्रास आहे, त्यांनी बर्फाचा वापर अत्यंत सावधगिरीने करावा.

# गरजेपेक्षा जास्त विश्वास का ठेवल्यावर धोकादायक कधी बनते?

**नात्यांची सुरुवात आणि त्यांचे टिकणे दोन्ही विश्वासावर अवलंबून असते. विश्वासाशिवाय कोणतेही नाते टिकणे अशक्य आहे, पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, जेव्हा हा विश्वास गरजेपेक्षा जास्त होतो, तेव्हा तो आपली सर्वात मोठी कमजोरी का बनतो ? मानसशास्त्रज्ञ अर्पिता कोहली यांच्याकडून समजून घेऊया, की आपण लोकांवर गरजेपेक्षा जास्त विश्वास का ठेवतो आणि ते धोकादायक कधी बनते...**



### आपण विचार न करता विश्वास का ठेवतो?

आपण माणसे एकटे जगू शकत नाही. आपल्याला नेहमी समाजाची, आपल्या प्रियजनांच्या प्रेमाची आणि सुरक्षिततेची गरज असते. लहानपणापासूनच आपल्या मनात ही कल्पना रुजवली जाते की कुटुंब आणि जवळचे लोक आपलेच आहेत, आणि म्हणूनच आपण त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे. हळूहळू, ही एक सवय बनते. या सवयीमुळे, आपण अनेकदा खोलवर विचार न करता इतरांवर विश्वास ठेवतो.

### जेव्हा विश्वास बनतो मोठा धोका...

जेव्हा आपण आयुष्यात एखाद्याला खूप जास्त अधिकार देतो आणि मर्यादा घालत नाही, तेव्हा समोरच्या व्यक्तीला आपल्या प्रत्येक कमकुवतपणाची जाणीव होते. आंधळ्या विश्वासामुळे समोरची व्यक्ती जे काही सांगते ते सर्व आपण खरे मानतो आणि अगदी स्पष्ट धोक्याच्या सूचनांकडेही दुर्लक्ष करतो. यामुळे अनेक परिणाम होऊ शकतात...

- **फसवणुकीला बळी पडणे.**
- **आपल्या अत्यंत वैयक्तिक आणि खासगी माहितीचा गैरवापर होणे.**

### मदत करणाऱ्यांच्या उणिवांकडे दुर्लक्ष करणे...

जेव्हा आपण अडचणीत असतो आणि कोणीतरी आपल्याला मदत करण्यासाठी पुढे येते, तेव्हा साहजिकच आपल्याला त्या व्यक्तीबद्दल आपुलकी वाटते. आपण असे गृहीत धरतो की, जी व्यक्ती आपल्या हिताचा विचार करते, ती आपल्याला कधीही इजा पोहोचवणार नाही. या विचारसरणीमुळे आपण त्या व्यक्तीच्या उणिवा किंवा त्यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतो, जे नंतर खोटे ठरू शकते.

### स्वत:च्या मानसिक स्थितीचा परिणाम

- एकाकीपणा आणि आत्मविश्वासाचा अभाव : ज्यांना एकटेपणा जाणवतो किंवा ज्यांच्यात आत्मविश्वासाची कमतरता असते, ते अनेकदा इतरांकडून आधार शोधतात. थोडासा आधारही त्यांना पूर्णपणे परावलंबी बनवू शकतो.
- अति सकारात्मक विचार : काही लोक स्वभावाने इतके चांगले असतात की प्रत्येकामध्ये चांगलेच पाहतात. हा अति सकारात्मक विचार त्यांना कोणतीही पडताळणी न करता विश्वास ठेवण्यास भाग पाडू शकतो.

### योग्य उपाय काय आहे?

या संपूर्ण समस्येचा अर्थ असा नाही की आपण जगावर विश्वास ठेवणे पूर्णपणे सोडून द्यावे. खरे शहाणपण हे आहे की विश्वास ठेवावा, पण लगेच नाही. विश्वास हळूहळू आणि आपल्या स्वतःच्या अनुभवांवर आधारित विकसित केला पाहिजे. आपल्या नात्यांमध्ये मर्यादा आखायला शिका. जर कोणी वारंवार तुमचा विश्वासघात करत असेल, तर त्यांना दुसरी संधी देण्यापूर्वी अत्यंत सावधगिरी बाळगणे हे सर्वोत्तम पाऊल आहे.



# सर्वात मोठा धोका अनोळखी नव्हे, ओळखीचेच लोक का बनत आहेत?

**लहानपणापासून आपल्याला अनोळखी लोकांपासून दूर राहायला आणि त्यांना टाळायला शिकवले जाते, परंतु आजच्या काळात हा जुना विचार बदलावा लागत आहे. मानसशास्त्रज्ञ अर्पिता कोहली यांच्या मते, अलीकडील प्रकरणे हे सिद्ध करतात की आपल्याला बाहेरील लोकांपेक्षा आपल्या जवळच्या वर्तुळातील लोकांबाबत जसे, की मित्र, नातेवाईक, शेजारी किंवा सहकारी यांच्याचबद्दल अधिक सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. आपले ओळखीचे लोकच आपल्यासाठी सर्वात मोठा धोका का बनत आहेत ? त्याची मुख्य कारणे समजून घेऊया...**



### विश्वासाचा गैरवापर

आपण अनोळखी लोकांशी नेहमीच सावधगिरी बाळगतो, पण आपल्या जवळच्या लोकांबाबतीत आपण गाफील राहतो. आपण आपली वैयक्तिक माहिती, आपल्या भावना आणि आपल्यातील कमकुवतपणासुद्धा त्यांच्यासोबत सहजपणे शेअर करतो. त्यामुळे जर त्या ओळखीच्या व्यक्तीचा हेतू वाईट असेल, तर आपल्याला इजा पोहोचवण्यासाठी त्यांना फार कष्ट घ्यावे लागत नाहीत.

### कमकुवत होत असलेले नातेसंबंध

आपल्या समाजाची आणि कुटुंबाची रचनाही झपाट्याने बदलत आहे. आजच्या वेगवान जीवनात नातेसंबंधांमध्ये दृढता आणि योग्य संवादाचा अभाव आहे. लोक एकमेकांना नीट न समजता जवळ येतात, ज्यामुळे गैरसमज आणि तणाव निर्माण होतो. हा तणाव हळूहळू राग, मत्सर किंवा अगदी सूडात बदलतो. अशा परिस्थितीत, नुकसान करणारी व्यक्ती बाहेरची नसते, तर आपल्या आयुष्याचा भाग असलेली कोणीतरी असते.

### सोशल मीडियाचा देखावा अन् भ्रम!

आजच्या डिजिटल युगाने ही समस्या आणखी गुंतागुंतीची केली आहे. आपण सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्सद्वारे लोकांशी सतत जोडलेले असतो, परंतु हे कनेक्शन अनेकदा केवळ दिखाव्यासाठी असते. इंटरनेटवरील लोक स्वतःची एक वेगळी, कधीकधी खोटी प्रतिमा सादर करतात, जी वास्तवापेक्षा खूप वेगळी असू शकते. आपल्याला वाटते की आपण त्या व्यक्तीला खूप चांगले ओळखतो, पण प्रत्यक्षात तसे नसते. हा भ्रम अनेकदा गंभीर फसवणूक आणि विश्वासघाताकडे नेतो. आजच्या काळात, सुरक्षिततेचा अर्थ केवळ अनोळखी लोकांपासून दूर राहणे इतकाच नाही. प्रत्यक्ष जीवनात असो वा डिजिटल जगात, आपल्या सभोवतालच्या लोकांवर आंधळा विश्वास ठेवणे टाळणे आणि नेहमी आपली विवेकबुद्धी व दक्षता राखणे महत्त्वाचे आहे.

# प्रत्येक वादाचे मूळ तुम्हीच तर नाहीत?

## तुमच्या या 7 सवयी वाद मिटवण्याऐवजी करतात अधिक गुंतागुंतीच्या!

**प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही कोणाशी वाद घालता, तेव्हा समोरची व्यक्तीच पूर्णपणे दोषी होती, असा विचार तुमच्या मनात येतो का? जेव्हा आपण कोणाशी वाद घालतो, तेव्हा आपण लगेच समोरच्या व्यक्तीच्या चुकांकडे बोट दाखवतो, पण तुम्ही कधी शांतपणे विचार केला आहे का की या गोष्टीत तुम्ही स्वतःच खलनायक आहात? सत्य हे आहे की कधीकधी, नकळतपणे, आपणच वाद मिटवण्याऐवजी ते अधिक गुंतागुंतीचे करतो. चला, अशी चिन्हे जाणून घेऊया जी दर्शवतात की नेहमीच दुसरी बाजू दोषी नसते...**

- नेहमी आणि कधीही नाही... यांसारख्या शब्दांचा वापर : वादविवादादरम्यान, 'नेहमी' आणि 'कधीही नाही' यांसारखे शब्द मूळ मुद्द्यावरून लक्ष भरकटवतात. समोरच्या व्यक्तीवर 'तुम्ही नेहमी असे करता' किंवा 'तुम्ही ते कधीच करत नाहीत' असा आरोप केल्याने ती व्यक्ती बचावात्मक पवित्रा घेते. त्यामुळे वादविवादादरम्यान विषयावरच राहण्याचा प्रयत्न करा आणि असे शब्द वापरणे टाळा.
- वर्तनाऐवजी व्यक्तिमत्त्वावर हल्ला करणे : समोरच्या व्यक्तीच्या कामाबद्दल बोलण्याऐवजी त्यांच्या चारित्र्यावर किंवा व्यक्तिमत्त्वावर हल्ला करणे ही एक मोठी चूक आहे. जेव्हा एखाद्याच्या ओळखीवर हल्ला होतो, तेव्हा ती व्यक्ती स्वतःचे संरक्षण करण्याच्या प्रयत्नात लगेचच अधिक बचावात्मक बनते.
- हिशोब ठेवणे : नात्यांमध्ये हिशोब ठेवल्याने गोष्टी अधिक कठीण होतात. अनेकदा, लोक भांडणाच्या वेळी भूतकाळातील चुकांची यादी काढतात. जुने मुद्दे उकरून काढल्याने मूळ समस्या सुटण्याऐवजी अनेकदा नवीन भांडण सुरू होते.
- स्वतःसाठी आणि इतरांसाठी वेगवेगळे नियम : आपण अनेकदा आपल्या कठोर स्वराचे कारण थकवा किंवा तणाव असल्याचे सांगून त्याचे समर्थन करतो, परंतु जर समोरची व्यक्ती त्याच स्वरात बोलत राहिली, तर आपल्याला अपमानित झाल्यासारखे वाटते.
- प्रत्येक नात्यातील तणाव : जर प्रत्येक मैत्री किंवा नातेसंबंध संघर्षाने भरलेले असेल, तर त्यावर विचार करणे महत्त्वाचे आहे. कधीकधी लोक नकळतपणे संघर्ष निर्माण करतात कारण त्यांना या क्षुल्लक वादांमधून भावनिक समाधान मिळते. ही पद्धत ओळखणे हे बदलाचे पहिले पाऊल आहे.
- रागाच्या भरात सर्व काही विसरणे : अनेकदा, रागाच्या भरात आपल्याला फक्त आपणच बरोबर आहोत असे वाटते. संघर्ष सोडवण्यासाठी दोन्ही पक्षांनी एकमेकांचा दृष्टिकोन समजून घेणे आवश्यक आहे. स्वतःच्याच दृष्टिकोनावर ठाम राहिल्याने समस्या अधिकच वाढते.
- सर्व काही समजावून सांगणे... : जेव्हा आपण बचावात्मक पवित्रा घेतो, तेव्हा आपले मन समोरच्या व्यक्तीचे ऐकणे थांबवते. तुम्ही तणावाखाली आहात आणि ऐकण्यास असमर्थ आहात हे लक्षात येताच, थांबा. काही वेळ त्या विषयावर चर्चा करा आणि शांत डोक्याने समस्येवर विचार करा.

# भीषण अपघातात नववधूसह तिघांचा मृत्यू







**जळगाव (प्रतिनिधी) –** जळगावमधून एक अतिशय भीषण आणि तितकीच धक्कादायक बातमी समोर आली आहे. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराडखुर्द जवळ महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. टायर फुटल्याने झालेल्या या कारअपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. दुर्दैवी गोष्ट म्हणजे या मृतांमध्ये, नुकतच लग्न झालेल्या एका नववधूचाही समावेश असल्याच माहिती समोर आली आहे. या अपघातात सहा जण गंभीर जखमी असून एका लहान बालकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, गुजरात च्या वापी येथून लग्नाचं वऱ्हाड घेऊन अकोला येथे ही क्रूझर कार जात होती. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील वराडखुर्द जवळ महामार्गावर असतानाच या धावत्या क्रूझर कारचं टायर अचानक फुटलं आणि ही कार त्या रोडलगत उभ्या गॅस टँकरवर जाऊन धडकली. अतिशय भीषण अशी ही धडक होती. लग्न झाल्यानंतर नववधूला परत घेऊन येताना जळगाव मधील वराड गावाजवळ हा अपघात घडला आहे. यामध्ये तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, जिचं नुकतंच लग्न झालं अशा नववधूचाही मृतांमध्ये समावेश असून त्यामुळे सगळेच हळहळले. नववधू पूजा रवी वाघळकर, दत्तू भागवत, जगदीश वाघळकर अशी अपघातात मृत झालेल्यांची नावे असून तिघेही एकच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे. तर या अपघातात आणखी ६ जण जखमी असून लहान मुलाची प्रकृती गंभीर आहे. दुसरीकडे बुलढाण्यात एक दुर्दैवी घटनाघडली आहे.

बुलढाणा तालुक्यातील गिरडा येथील चेतन सोळंकी या १८ वर्षीय विद्यार्थ्याचा बस स्थानकात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे गिरडा गावात शोककळा पसरली आहे. चेतन हा पोलिस भरतीची तयारी करत होता, छत्रपती संभाजीनगर येथे त्याने तसा प्रयत्न ही केला असून मैदानी चाचणीत तो खरा उतरला असून लेखी परीक्षा बाकी होती. काल संध्याकाळी सायंकाळी चेतन हा बुलढाणा वरुण धाड ते मढ या एस टी बसमध्ये जाण्यासाठी चढत होता, मात्र गर्दी असल्याने तोल जाऊन तो बसच्या चाकाखाली आली.

# महाराष्ट्र एआय धोरण २०२६ जाहीर; दहा हजार कोटींची गुंतवणूक, दीड लाख रोजगार संधी

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर वाढविण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत 'महाराष्ट्र एआय धोरण–२०२६' जाहीर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

'इंडिया एआय मिशन'च्या धर्तीवर राबविण्यात येणाऱ्या या धोरणाच्या माध्यमातून संशोधन, नवोपक्रम आणि जबाबदार प्रशासन यांना चालना देण्यात येणार आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार आहे, त्यामुळे या धोरणात वेळेनुसार काळानुरूप बदल करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. २०३१ पर्यंत दहा हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि दीड लाखांहून अधिक रोजगार निर्माण करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहेत. जागतिक पातळीवर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अनेक देशांची स्पर्धा सुरु असताना महाराष्ट्राने 'नैतिक व सर्वसमावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाचे राष्ट्रीय केंद्र' ही आपली ओळख निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी 'महाराष्ट्र एआय मिशन' स्थापन करण्याचा प्रस्ताव या धोरणात मांडण्यात आला आहे. राज्यातील दोन लाख युवक व व्यावसायिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजनाही यात अंतर्भूत आहे.

नैतिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात महाराष्ट्राने 'इंडिया एआय मिशन'साठी संदर्भ राज्य म्हणून ओळख मिळवावी हाच या धोरणाचा आत्मा आहे. हे धोरण सात आधारस्तंभांवर उभारण्यात आले आहे. पहिला आणि सर्वात महत्त्वाचा स्तंभ म्हणजे राज्यव्यापी एआय पायाभूत सुविधांचा विकास. यात किमान दोन हजार जीपीयू संगणन क्षमता उपलब्ध करणे आणि 'कम्प्युट अँज अ सर्व्हिस' या संकल्पनेतून शासकीय विभागांनाही या सुविधा वापरता येतील, अशी यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. पाच नवोन्मेष क्षेत्रांमध्ये एआय शहरेही विकसित केली जाणार आहेत. दुसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे स्थानिक डेटाचा वापर. मराठी भाषेसह प्रादेशिक बोलीभाषा आणि आदिवासी भाषांचे डेटासेट्स तयार करणे आणि 'स्टेट एआय डेटा एक्सचेंज' स्थापन करणे, हे या भागाचे वैशिष्ट्य असेल. केंद्र सरकारच्या 'एआय कोष' व्यासपीठाशी राज्याची यंत्रणा जोडली जाणार आहे. तिसऱ्या स्तंभात 'महाराष्ट्र प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण केंद्र' (एमसीएटी) स्थापन करण्याची योजना आहे. उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्या दुहेरी भागीदारीतून हे केंद्र कार्य करेल.


## नोकरीची सुवर्णसंधी

ड्रायफ्रूट्स, टूटी फ्रूटी चेरी, आईस्क्रीमसाठी जेली तसेच मीठा पान चटणी यांच्या मार्केटिंगसाठी मेहनती व सुशिक्षित मुलांची आवश्यकता आहे.

**कामाचे ठिकाण :– नांदेड शहर व जिल्हा**
**पगार : रू. १५,००० ते रू. २०,००० पर्यंत**
बिझनेसवर आकर्षक बोनस देखील दिला जाईल
उमेदवाराकडे स्वतःचे टू–व्हीलर असणे आवश्यक आहे
**इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा:**
**फ्रेंड्स जर्दा स्टोअर, जुना मोंढा, नांदेड**
**मो. नं. ८६८८९६९७५५**


## बुलढाणा मेडिकल कॉलेजला राजमाता जिजाऊंचे नाव

**बुलढाणा (प्रतिनिधी) –** बुलढाण्यातील १०० विद्यार्थी क्षमता आणि ४३० खाटांचे संलग्न रुग्णालय असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आता 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा' असे नामकरण करण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने यासंदर्भात अधिकृत शासन निर्णय निर्गमित करून या नामकरणाला मंजुरी दिली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा हे राजमाता जिजाऊंचे जन्मस्थान असल्याने, येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला त्यांचे नाव देऊन त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला आहे. राष्ट्रप्रेम, त्याग आणि शौर्याचे प्रतीक असलेल्या राजमाता जिजाऊंनी आपल्या दूरदृष्टीने आणि संस्कारांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा दिली. स्त्रीशक्तीचे प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊंच्या नावासोबत या महाविद्यालयाला आता एक उच्च आदर्श आणि लोककल्याणाची जोड मिळाली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्याच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला असून, 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय' हे केवळ एक शैक्षणिक केंद्र न राहता उत्तम आरोग्य सेवेचे ऊर्जाकेंद्र ठरेल.

## Change In Name

My old name is **SHIVAJIRAO MUNDIK** which is now i am changing New name **SHIVAJI KISHANRAO MUNDIK** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Address :- Sajay Thote, Bhavitavya Nagar, Taroda Ku. Nanded Nanded

## Change In Name

My old name is **MAYURESH MUNDIK** which is now i am changing New name **MAYURESH SHIVAJI MUNDIK** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Address :- Sajay Thote, Bhavitavya Nagar, Taroda Ku. Nanded Nanded

## जाहीर नोटीस

मौजे मुखेड, तालूका मुखेड, जिल्हा नांदेड येथील खालील प्रमाणे वर्णन असणारी मिळकत. सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे मुखेड, येथील खाली नमूद केलेली मिळकत ही आमचे अशीलांनी सदर मिळकतीचे महसूल अभिलेख सदरी दाखल असलेल्या कब्जेदारकडून आवश्यक त्या कायदेशीर तरतुदींची पूर्तता करून कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:
मौजे मुखेड, तालूका मुखेड, जिल्हा नांदेड.
कब्जेदाराचे नाव – विलास मधुकर चौधरी
स.नं. – ३३०/ए/३. हि.नं. – Nil. क्षेत्र हे.आर. – ००.८०

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कूळ, वहिवाट, ताबा कब्जा, लीजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अॅटॅचमेंट, लोन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह अथवा लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून मिळकतींचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाणः मुखेड
दिनांक: २८/०४/२०२६
अॅडव्होकेट श्री डी एम कोळणुरे
पत्ता :– वेंकटेश्वरा मल्टीसर्विसेस कोर्टाच्या समोर, मुखेड
मो.नं. ९३२११७१००१

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेडमधील प्लॉट क्र. ६३ हा मयत कै. गणेश लक्ष्मणराव बंडेवार यांचा असून त्यांना दोन मुले, दोन बहिणी व पत्नी असा परिवार असून यामधील आई आणि दोन मुली यांनी कोर्टातून हक्कसोड प्रमाणपत्र त्यांच्या दोन भावांना देण्यात आले आहे. सदरील प्लॉट वारसा अधिकाराने त्यांचे दोन मुले १) श्री लक्ष्मीकांत गणेशराव बंडेवार २) श्रीकांत गणेशराव बंडेवार यांच्या नावे करण्याचा अर्ज आला असून त्या प्लॉटची चतुःसिमा : पूर्वेस– प्लॉट नं. ५८, पश्चिमेस– रोड, उत्तरेस– प्लॉट क्र. ६२, दक्षिणेस–प्लॉट क्र. ६४ अशी असून या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या प्लॉट प्रकरणी कोणाची हरकत असल्यास संबंधितांनी लेखी आक्षेप उद्योग नगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेडचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे पुराव्यासह १५ दिवसांचे आत तक्रार नोंदवावी. या कालावधित आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप अथवा हरकत नाही असे गृहीत धरून सदरील प्लॉट ६३ हा सामाईकरित्या लक्ष्मीकांत गणेशराव बंडेवार व श्रीकांत गणेशराव बंडेवार यांच्या नावे हस्तांतर करण्यात येईल, असे जाहीर करण्यात येत आहे. करिता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**अध्यक्ष/सचिव**
**उद्योगनगर सहकारी भाडेकरू**
**मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेड**
**तथा लक्ष्मी के. सदन**
**कोसबतवार कॉम्प्लेक्स शिवाजीनगर, नांदेड**
**मो. ९९२२३३५२८५**



## सेवानिवृत्तीच्या अनंत शुभेच्छा

**श्री.हणमंत विठ्ठलराव मठ्ठमवार (लछनकर)**
मुख्याध्यापक
जि.प.प्रा.शाळा कांजाळा ता. लोहा जि. नांदेड

यांना सेवानिवृती निमीत् अनंत शुभेच्छा यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोगय लाभो ही सदिच्छा
दि.३० एप्रिल २०२६

**✻ शुभेच्छुक ✻**
**१ श्री. राजेश मठमवार**
**२ श्री. राम चिटब्रोणे**
**३ डॉ. गौरव राजमोड**
**सर्व मठमवार परीवार**

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०८/२०२६
**अब्दुल रहेमान व ईतर विरुध्द निरंक**

**अर्जदार** :– १. अब्दुल रहेमान अब्दुल बशीर अहेमद इनामदार, वय– ७२ वर्षे, रा. कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड
२. मोहम्मद इसाक इनामदार, वय– ६९ वर्षे, रा. कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड
३. अब्दुल करीम बशीर अहेमद, वय– ६८ वर्षे, रा. तट्टीकोट रोड, बोधन जि. निझामाबाद
४. शेख अब्दुल गणी शेख बशीर अहमद, वय– ६५ वर्षे, रा. अनीसनगर, बोधन जि. निझामाबाद
५. शेख हैदर बशीर अहमद इनामदार, वय– ६१ वर्षे, रा. कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड
६. शेख मोहम्मद युनुस बशीर अहमद, वय– ५७ वर्षे, रा. तट्टीकोट रोड, बोधन ता. बिलोली जि. नांदेड
७. अब्दुल रजाक बशीर अहेमद इनामदार, वय– ५६ वर्षे, रा. बाजीराव नगर, सांगवी बु. जि. नांदेड

निरंक

विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **बशीर अहमद हैदर शेख** यांचे अर्जदार क्र. १ ते ७ हे मुले आहेत. मयत हे मौजे कुंडलवाडी ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **बशीर अहमद हैदर शेख** यांचा मृत्यु दिनांक **दि.०६/०६/१९८५** रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदाराची आई ही दिनांक ०३/०६/२०१६ रोजी मयत पावली आहे. मयताचे आई व वडील हे फार वर्षापुर्वी मयत पावले आहेत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **बशीर अहमद हैदर शेख** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १२/०६/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

### जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७/२०२६** पुढील तारीख – १८.०६.२०२६

अर्जदार : ०१. नागमणी गुंडप्पा मिनगुरोड, वय – ६० वर्षे, व्यवसाय – शेती, रा. लोहार गल्ली, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड.
०२. लक्ष्मण गुंडप्पा मिनगुरोड, वय – ४२ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. लोहार गल्ली, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड.
०३. अशोक गुंडप्पा मिनगुरोड, वय – ३३ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. लोहार गल्ली, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड.
०४. पिलीकांडला गंगामणी अंजनुयालू, वय – ४८ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. ईर्थोंडा एम. कोटगिरी, जि. निझामाबाद.
०५. बोनिगे सुजाता राजू, वय – ३३ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. संगम एम. बोधन जि. निझामाबाद.
०६. कांडीकतला हिरामणी संतोष, वय – ३४ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. पंनगली बोधन ता. बोधन जि. निझामाबाद टि.एस.

विरुध्द.

गैरअर्जदारः निरंक

**विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०६ हे **मयत गुंडप्पा इरन्ना मिनगुरोड** यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार हि **मयत गुंडप्पा इरन्ना मिनगुरोड** यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे मुले व अर्जदार कमांक ०४ ते ०६ हया मुली आहेत. **मयत गुंडप्पा इरन्ना मिनगुरोड** यांचा मृत्यु दिनांक २८.०८.२०२३ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार हयांना **मयत दत्ता सयदु गायकवाड** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली
आदेशावरून, सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

### सन्माननीय दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, नांदेड

(श्री. ए.जि. चव्हाण1वे न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदेड)
दिवानी किरकोळ अर्ज क्रमांक:- 523 /2026.

अर्जदार: 1. दुर्गा भ्र. महेश देशपांडे, वय: ५२ वर्षे, कामधंदा: गृहिणी, रा. पंकज नगर, धनेगाव, नांदेड, ता. जि. नांदेड.
2. मानसी पि. महेश देशपांडे, वय: २३ वर्षे, कामधंदा: शिक्षण, रा. पंकज नगर, धनेगाव, नांदेड, ता. जि. नांदेड.
3. मयूरी पि. महेश देशपांडे, वय: २५ वर्षे, कामधंदा: गृहिणी, रा. प्रसाद सराफ, एन.डि.-४२, डि.३, ४८/४, वसंतराओ नाईक कॉलेज समोर, होळकर नगर, सिडको, नवीन नांदेड, काउठा, नांदेड, ता. जि. नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार: निरंक
दावा: बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट 1827 च्या कलम 2 व 3 प्रमाणे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सन्माननिय सर,

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. **महेश पि. गुंडेराव देशपांडे** यांचा मृत्यू दिनांक ०९/०२/२०२६ रोजी झाला आहे. हे की, अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक 10 / 06 /2026 रोजी किंवा जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत सादर करावेत, अन्यथा यानंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक 27 /04 /2026 रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून/– कनिष्ठ लिपीक
आदेशावरून/– सहायक अधीक्षक

दीवाणी न्यायालय कनिष्ठस्तर, नांदेड

### जाहीर प्रगटन

कंधार येथील जिल्हा न्यायाधीष–१ यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री. एम.एम.पाटील, जिल्हा न्यायाधीश–१. कंधार )
दिवाणी किरकोळ अर्ज क. ६३/२०२५
उन्नतीशील महिला मंडळ व इतर वि. निरंक

अर्जदार :– १. उन्नतीशिल महिला मंडळ तर्फे सावित्रीबाई फुले शिशु ग्रह लोहा अधिक्षक ज्योती कालीदास सावले, वय. ५० वर्षे, व्यवसाय. समाजकार्य, रा.लोहा, ता.लोहा, जि.नांदेड
२. कर्ना सैनगुप्ता पि.कुणाल सैनगुप्ता, वय. ४० वर्षे, व्यवसाय. नौकरी
३. ज्योतीका निगम भ्र.कर्ना सैनगुप्ता, वय. ३९ वर्षे, व्यवसाय. खाजगी नौकरी
दोघे रा.५०८ अगतसस दामखेडा,कोलार रोड,भोपाळ, ता.,जि.भोपाळ

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार क.१. उन्नतीशिल महिला मंडळ तर्फे नामे अधिक्षक ज्योती कालीदास सावले वय. ५० वर्षे, व्यवसाय. समाजकार्य रा.लोहा, ता.लोहा, जि.नांदेड यांनी अर्जदार क. ०२ व ०३ यांना या न्यायालयात अज्ञान मुलगी नामे मयुरी उर्फ काशवी वय ६ महिणे हिस अर्जदार क. ०२ व ०३ यांनी Under Section 56(4) Juvenila Justice ( Care & Protection of Children ) Act. 2015 या कायद्या अन्वये दत्तक घेण्याचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

या व्दारे सर्वांना सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणात कुणाला आक्षेप असल्यास सदरने जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वत: अथवा वकिला मार्फत हजर राहून सदरील प्रकरणात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदरील प्रकरणात कुन्हा ति–हाईत व्यक्तीचा काही–एक आक्षेप नाही असे ग्राहय धरुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदरील प्रकरणाची पुढिल तारीख ०५.०५.२०२६ असुन त्यानंतर आलेल्या आक्षेप ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

आज दिनांक ०९.०४.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

वरीष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय, कंधार
आदेशावरुन (अधिक्षक) जिल्हा न्यायालय कंधार, Dist. Court Kandhar

## Change In Name

My Old Name is **SHAIKH RAHEMAN SHAIKH RAHEEM** which now I am changing as New Name **SHAIKH RAHMAN SHAIKH RAHIM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - Duleshah Raheman Nagar, Behind Gaus Kirana, Nanded 431601**
**Mo.No. 9689658155**

## Change In Name

My old name is **HAMBARDE SHUBHANGI KALABAJI** which is now i am changing New name **SHUBHANGI KALBA HAMBARDE** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Signby - **SHUBHANGI KALBA HAMBARDE**
Address :- Patil Galli, Near Gurudwara, VTC Vishnupuri, Dist. Nanded Maharashtra 431606
Mo.No. 9209072506

## Change In Name

My old name is **KALBAJI VITTHALRAO HAMBARDE** which is now i am changing New name **KALBA VITTHALRAO HAMBARDE** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Signby - **KALBA VITTHALRAO HAMBARDE**
Address :- Lohar Galli, At.Po. Vishnupuri, VTC Vishupuri, Dist. Nanded Maharashtra 431606 Mo.No. 9096600450


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# जुना मोंढा ते नवीन पुलापर्यंतच्या अतिक्रमणावर कारवाईचा बडगा

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते मोकळे करण्यासाठी बुधवारी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आणि पोलीस विभागाच्यावतीने संयुक्तपणे अतिक्रमण विरोधी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईत जुना मोंढा टॉवर ते जुना मोंढा ब्रिज दरम्यानच्या मुख्य रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे हटवण्यात आली आहे. बुधवार, दिनांक २९ एप्रिल रोजी महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथक व पोलीस प्रशासनाने जुना मोंढा या परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूने झालेले अतिक्रमण काढून टाकले आहे. या कार्यवाही दरम्यान एका अतिक्रमणधारकास रस्त्यावर कचरा टाकल्याने तसेच अतिक्रमण केल्यामुळे दहा हजारांचा दंड पालिकेमार्फत आकारण्यात आला आहे.




महानगरपालिकेने १०० दिवसांचा कृती आराखडा जाहीर केला होता. त्यापैकी शहरातील मुख्य चौक सुशोभिकरणासह अतिक्रमण मुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्याचाच भाग म्हणून या कार्यवाही दरम्यान रस्त्यावर अनधिकृतपणे लावलेले हातगाडे, फ्लेक्स बोर्ड, लोखंडी शेड आणि पक्क्या बांधकामांचे वाढीव भाग जमीनदोस्त करण्यात आले. जुना मोंढा हा व्यापारी भाग असल्याने येथे नेहमीच ग्राहकांची गर्दी असते. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अतिक्रमणांमुळे रुग्णवाहिका आणि इतर वाहनांना जाण्यास मोठा अडथळा निर्माण होत होता. वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण न काढल्याने ही कठोर पावले उचलण्यात आली आहेत. या कारवाईत जेसीबीच्या सहाय्याने जवळपास २५ ते ३० अतिक्रमण- धारकांवर कारवाई करण्यात आली. तसेच तब्बल ४ ट्रक माल जप्त करण्यात आला आहे.

सदरील कारवाई पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली. या कारवाईत इतवारा शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जगन पवार व त्यांच्या पथकाच्या सहकार्याने अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त रावण सोनसळे, अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर, विशाल सोनकांबळे यांच्यासह महापालिकेचे ३० कर्मचारी तसेच पोलीस विभागातील २० कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण न करता रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. शहरातील मुख्य रस्ते अथवा इतरत्र अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा महापालिका प्रशासनातर्फे देण्यात येत आहे. यापुढे सुध्दा महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची मोहीम सुरूच राहील, असे यावेळी मनपा उपआयुक्तअजितपालसिंघ संधु यांनी स्पष्ट केले.

# किनवट तालुक्यातील १० ग्रामपंचायत पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर

**किनवट (प्रतिनिधी)** – तालुक्यातील १० ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी दि. २८ रोजी एकूण २७ मतदान केंद्रांवर शांततेत मतदान पार पडले. त्यानंतर बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी येथील तहसील कार्यालयात सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रिया सुरू होऊन ती पाच फेऱ्यांत सुरळीत पूर्ण झाली. प्रशासनाच्या दक्षतेमुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली.

**सक्रुनाईक तांडा :** सरपंच अरविंद दुलसिंग चव्हाण, सदस्य अजय प्रकाश राठोड, वैष्णवी गोकुळ राठोड, वंदना रमेश पवार, गणेश मधु चव्हाण, सुनिता सुहास राठोड, केतन अरविंद आडे, भाग्यशाली अमोल राठोड. **निराळा तांडा :** सरपंच बाबुसिंग रामचंद्र राठोड; सदस्य अवीन विलास राठोड, कांताबाई रमेश राठोड, जगदीश संतोष आडे, कल्पना भारत राठोड.**सिंगोडा :** सरपंच यशोदा किसन कनाके. **कुपटी (खु.) :** सरपंच उमाबाई किरण गव्हांडे. **टेंभी रायपूर :** सरपंच प्रियंका आंकुश राठोड; सदस्य विनोद जयसिंग चव्हाण, निर्मला पुरसिंग चव्हाण, दीपिका नामदेव पवार, ईश्वर आनंदराव जाधव, शाम्का धरमसिंग जाधव, पंचीबाई इंदल राठोड, अंकुश उत्तम राठोड, दिनेश दुलसिंग पवार, सुष्मा मुनेश जाधव. **पिंपळगाव (सि.) :** सरपंच पुरुषोत्तम भाऊराव पेंदोर. **खंबाळा :** सरपंच वंदनाबाई मोहन पवार; सदस्य फुलमा खंडू चव्हाण, अनुसया अर्जुन राठोड, सविता रमेश राठोड, चंचल अंकुश



राठोड, योगेश्वरी रविंद्र चव्हाण. **गोकुंदा :** सदस्य निलावती गंगाराम दांडेगावकर. **कोठारी (सि.) :** सदस्य पुष्पा प्रभाकर मेश्राम. **जरूर :** सरपंच रविंद्र शालीकराव मेश्राम.

या निवडणूक प्रक्रियेसाठी तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी डॉ. शारदा चोंडेकर, नायब तहसीलदार बालाजी फोले व मोहम्मद रफीक, अधिकारी निलेश राठोड, सहायक महसूल अधिकारी डी. सी. भुरे, तसेच उत्तम कानिंदे, मल्लिकार्जुन स्वामी, लिंबेश राठोड, पठाण, शेख, तलाठी विश्वास फड आदींनी प्रयत्न केले. उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी समर्थकांसह जल्लोष केला.

# कामगारांनी काम बंद आंदोलन केल्यास मनपाकडून अमृत एंटरप्राईझेस कंपनीला गुन्हा दाखल करण्याची नोटीस

**नांदेड (प्रतिनिधी)** – मनपातील सफाई कामगारांना कामावर परत घेण्यात यावे या मागणीसाठी नांदेड वाघाळा महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियनचे संस्थापक अध्यक्ष गणेश शिंगे यांच्या नेतृत्त्वाखाली द्वारसभा पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी धरणे, मुंडन आंदोलन करण्यात आले. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांना घेराव घालण्यात आला. त्यानंतर बुधवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मनपावर शिंगे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. मोर्चा मनपावर धडकला. तत्पूर्वी मनपा प्रशासनाने सफाई कामगारांच्या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेतली.




यावेळी गुरुवार, दि. ३० एप्रिलपासून बेमुदत काम बंद करण्याचा इशारा दिला. सफाई कामगारांच्या आंदोलनाची मनपा प्रशासनाने दखल घेऊन सफाई कामगारांचे काम बंद आंदोलन झाले तर अमृत एंटरप्राईझेस कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची नोटीस बजावली. या नोटीसची अमृत एंटरप्राईझेस कंपनीने दखल घेत शिंगे यांना सफाई कामगारांचे काम बंद आंदोलन रद्द करण्याची विनंती केली. अमृत कंपनीच्या विनंतीला शिंगे यांनी मान देत गुरुवारपासूनचे काम बंद आंदोलन स्थगित केले.

मनपा प्रशासन व अमृत एंटरप्राईझेस कंपनीवर विश्वास ठेवून गुरुवारपासूनचे आंदोलन तुर्त स्थगित करण्यात आले असल्याचे शिंगे यांनी सांगितले. येत्या आठ दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास कामावरून कमी केलेल्या ८०-८५ कामगारांसोबत मनपाच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा शिंगे यांनी दिला.

> सफाई कामगारांच्या मागण्या सोडविण्यास मनपा प्रशासन अपयशी ठरले, असा आरोप शिंगे यांनी केला. मनपा प्रशासन अमृत एंटरप्राईझेस कंपनीला समोर करत आहे. सफाई कामगारांच्या मागण्या सोडविल्या नाही तर यापुढे मनपा प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिंगे यांनी दिला.

# अवैध वाळू घाटावर पोलिसांची कारवाई; २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध वाळू उपश्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे. घटनास्थळावरून जवळपास २५ लाख पन्नास हजारांचा मुद्देमाल जप्त करून त्यापैकी काही जागेवरच नष्ट केला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या आदेशावरून नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २८ एप्रिल रोजी अधिकारी व अंमलदार पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना ३.१० वाजता गोपनीय माहिती मिळाली की, गंगाबेट



परीसरातील गोदावरी नदीपात्रात इंजीन व तराफेच्या साहायाने अवैध रेती उपसा करून साठवणूक होत आहे, या माहितीवरुन वरील अधिकारी व अंमलदार यांनी मौ. गंगाबेट हद्दीतील गोदावरी नदीपात्रात वेळ अंदाजे ३.५० वाजता छापा करवाई केली असता नदी पात्रातून, तराफे व इंजीनच्या साह्याने रेती काढणारे अनोळखी पाच आरोपी पोलिसांना पाहून पळून गेले. सदर नदी पात्रात मिळून आलेले नमूद तराफे व इंजीन घेऊन येणे शक्य नसल्याने जागीच पंचासमक्ष नष्ट केले व नदी किनारी साठवून ठेवलेली रेती पंचांसमक्ष जप्त करण्यात आली.

या प्रकरणी अनोळखी पाच आरोपींविरुद्ध कलम ३०३(२), ३(५) भा. न्या सं, सहकलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५, सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम ३७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**नांदा सौख्यभरे**

**कसबे – भुजबळ**

नांदेड- तरोडा बु. परिसरातील सिद्धार्थ नगरातील रहिवासी सौ. यशोधरा व अनिल कसबे यांचे सुपुत्र ॲड. मयुर यांचा मंगल परिणय वानवडी पुणे येथील रहिवासी सौ. अनिता व शामराव भुजबळ यांची सुकन्या ॲड. ऐश्वर्या हिजसमवेत नुकताच पार पडला. त्या प्रीत्यर्थ गुरुवार दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वा. लक्ष्मी गार्डन मंगल कार्यालय येथे स्वागत समारोह आयोजित करण्यात आला आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

–मुख्यसंपादक


## बालाजी बोळेगावे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –देगलूर तालुक्यातील ग्राम वन्नाळी येथील रहिवासी बालाजी नागनाथराव बोळेगावे (५५) यांचे बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुली, जावई, दोन भाऊ, भावजय, बहिणी, भाऊजी, नातू, पणतू असा परिवार आहे.



## कुंडलवाडीतील बँकांमध्ये रोकड टंचाई; लग्नसराईत वधू-वर पित्यांची दमछाक

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** – कुंडलवाडी शहरातील विविध बँकांमध्ये सध्या रोकड टंचाई निर्माण झाल्याचे चित्र असून, याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांसह लग्नसराईतील वधू-वर पित्यांना बसत आहे. शहरात एकूण सहा बँका असतानाही कोणत्याच बँकेत पुरेशी रोकड उपलब्ध नसल्यामुळे खातेदारांना वारंवार बँकेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासूनच बँकांमध्ये पैशांची चणचण जाणवू लागली होती. मात्र एप्रिल महिन्यात ही समस्या अधिकच तीव्र झाली असून, अनेक बँकांमध्ये ग्राहकांना रोख रक्कम मिळणे कठीण झाले आहे. एटीएम केंद्रेही बहुतांश ठिकाणी बंद किंवा 'नो कॅश' अवस्थेत दिसत असून ती केवळ शोभेची वस्तू ठरत आहेत. या परिस्थितीचा परिणाम बाजारपेठेवरही दिसून येत आहे. रोख रक्कम नसल्यामुळे नागरिकांना खरेदी-विक्री करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## नंदीग्राम एक्सप्रेस काही दिवस दादरपर्यंतच धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)** – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील प्लॅटफॉर्म क्रमांक १६ व १७ वर सुरू असलेल्या पुनर्विकास कामांमुळे ट्राफिक ब्लॉकचा कालावधी वाढविण्यात आला आहे. हे काम Rail Land Development Authority मार्फत करण्यात येत आहे.

यामुळे गाडी क्रमांक ११००२ बल्लारशा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नंदीग्राम एक्सप्रेस ही दि. २६ एप्रिल २०२६ ते १८ मे २०२६ या कालावधीत दादर येथे शॉर्ट टर्मिनेट करण्यात येईल. या तारखे दरम्यान ही गाडी दादरपर्यंतच धावणार आहे. प्रवाशांनी या बदलाची नोंद घ्यावी व त्यानुसार प्रवासाचे नियोजन करावे. या कामांमुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासन दिलगीर असून, प्रवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## प्रताप गायकवाड खून प्रकरण : आणखी सहा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरापासून जवळच असलेल्या नवीवाडी भागात प्रताप गायकवाड नावाच्या युवकाचा चाकूने भोसकून खून करण्यात आला होता. या खून प्रकरणात तीन आरोपींना घटना घडली त्याच दिवशी अटक केली होती. त्यानंतर तपासाने वेग घेत पुन्हा सहा आरोपींना अटक केली आहे. या सर्व आरोपींना भाग्यनगर पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन मेपर्यंत आठ जणांना पोलीस कोठडीत पाठवले आहे.

केशव दत्ता गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा प्रताप गायकवाड याची पैशांच्या देण्याघेण्याच्या वादातून हत्या करण्यात आली. विजय वायवळ, सुरज सदाशिव बुक्तरे आणि अनिकेत उर्फ सोनू बुक्तरे या आरोपींनी संगनमत करून प्रताप गायकवाड याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक २३०/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३, ३५१(३) तसेच इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सुरुवातीला विजय रुखमण वायवाळ, सुरज सदाशिव बुक्तरे व अनिकेत उर्फ सोनू सदाशिव बुक्तरे या तिघांना पोलिसांनी अटक केली होती. न्यायालयाने त्यांना बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती.

तपासादरम्यान इतर आरोपींचा सहभाग उघडकीस आल्याने पोलिसांनी गोरखनाथ गोविंदराव तागडे (वय ३६), संकेत गोरखनाथ दुथडे (वय २५), सारंग नारायण कोयाळकर (वय ५५), रामदास उर्फ स्वराज ज्ञानोबा कांबळे (वय २५), सुरज संभाजी बादवड (वय १९) व ओमकार पांडुरंग वंजारे (वय २५) यांना अटक केली.

## नांदेड येथील क्षत्रिय राजपूत समाज संस्थेचा निवडणूक कार्यक्रम तत्काळ जाहीर करा; धर्मदाय सहआयुक्त यांचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील श्री क्षत्रिय समाज संस्था अंतर्गत श्री रेणुका माता मंदिर संस्था, गाडीपुरा या संस्थेचा निवडणूक कार्यक्रम तत्काळ जाहीर करण्यात यावा, असे निर्देश धर्मदाय सहआयुक्तांनी दिले आहेत.

या संस्थेची निवडणूक होवून आठ ते नऊ वर्षाचा काळ संपला असून, दोन वर्षापूर्वी या संस्थेची निवड्णूक ही धर्मदाय सहआयुक यांचे आदेश व घटनेच्या आधारावर घेण्यात यावी म्हणून दि.२७ एप्रिल रोजी निवडणूक अधिकारी एस. अवचार यांना निर्देश देण्यात आले आहेत.



न्यासाची निवडणूक हे धर्मदाय सहआयुक्त यांच्या आदेशांप्रमाणे व सदर न्यासाच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे घेण्यात यावी, न्यासाच्या निवडणूककामी पोलीस मदत तसेच कार्यालयातील कर्मचारी यांचेही सहाय्य घ्यावे, न्यासाची निवडणूक आदेशाप्रमाणे लवकर घेवून तत्संबंधी न्यासाकडे सादर करावा. निवडणूक कामी निरीक्षक यांना सहकार्य करावे, कारण कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. सदरील आदेशाचे तंतोतंत पालन व्हावे अन्यथा आपणाविरुद्ध आदेशाचे उलंघन केले म्हणून कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

न्यासाच्या घटनेनुसार दरवर्षी सर्वसाधारण सभा व्हावी हे बंधनकारक असून, आठ ते नऊ वर्षात केवळ एक सर्वसाधारण सभा झाली असल्याचे सांगण्यात येते. या न्यासात तीन प्रकारचे सभासद असून, त्यात सर्वसाधारण, क्रियाशील व आजीवन सदस्य, सर्व साधारण व क्रियाशील सभासदांना केवळ पाच वर्षाचा कार्यकाळ आहे. आजीवन सभासद हे कायमस्वरूपी सभासद असतात. न्यासाच्या घटनेनुसार सभासदांना वेगवेगळे अधिकार आहेत. उशीर झाल्याने न्यासाच्या निवडणुकीत आजीवन सदूस्यांनी लवकरात लवकर निवडणूक घ्यावी म्हणून धर्मदाय सहआयुक्तांकडे पत्र व्यवहार केला होता.

निवडणूक कार्यक्रम पारदर्शिकतेने यशस्वीरित्या पार पडावा म्हणून न्यासाचे आजीवन सदस्य माधवसिंह, परमार, मनोज ठाकूर, मुन्नासिंग परिहार, शक्तीसिंह विदेह, गहलोत आदी परिश्रम घेत आहेत.

## नरसी येथे रामनवमीनिमित्त उद्या शोभायात्रा

**नरसी (प्रतिनिधी)** – श्रीराम जन्मोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त नायगाव तालुक्यातील नरसी येथे शुक्रवार, दि. १ मे रोजी रामनवमी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. धर्म, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यासाठी संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होण्यास सज्ज झाले आहेत.



या शोभायात्रेची सुरुवात दुपारी ४ वाजता श्री प्रभू राम मंदिर, जुने गाव नरसी येथून होणार आहे. धर्म, संस्कृती आणि एकतेसाठी एकत्र येऊया, संघटित होऊया, हिंदू शक्ती वाढवूया हा प्रेरणादायी संदेश देत ही शोभायात्रा गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणार आहे.

यावर्षीच्या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रभू श्रीरामांची भव्य मूर्ती, श्री बजरंगबलीची देखणी मूर्ती, नरसिंह अवताराचा जिवंत देखावा, नंदी-महादेवाचे प्रभावी सादरीकरण तसेच बाहुबली हनुमानाचा भव्य अवतार हे ठरणार आहेत. धार्मिक वातावरण अधिक भारावून टाकण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून, पुणे येथील ५०० स्क्वेअर फूट एलईडी स्क्रीन, नेक्सस लाईट्सची आकर्षक रोषणाई आणि ध्वनीव्यवस्था यामुळे शोभायात्रेला आधुनिकतेची जोड मिळणार आहे.

याशिवाय या पावन दिवशी समाजहित जपण्याच्या उद्देशाने रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. धार्मिकतेसोबतच सामाजिक बांधीलकी जपण्याचा हा स्तुत्य उपक्रम मानला जात आहे. प्रभू श्री रामनवमी समिती व समस्त गावकरी मंडळी, नरसी यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभायात्रा यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com